cmyk

## संपादकीय

### जगा आणि जगू द्या : हेच भारताचे तत्त्वज्ञान

बांगलादेशामधून भारतात आलेल्या निर्वासितांसाठी १७ नोव्हेंबरचा दिवस जणू सोनियाचा दिन ठरला. अनेक वर्षांच्या प्रतीक्षेनंतर निर्वासित बांगलादेशीयांना भारताचे नागरिकत्व प्राप्त झाले आहे. निर्वासित बांगलादेशीयांचे भारतातील वास्तव्य हा अनेक वर्षांपासून वादाचा मुद्दा बनला होता. सुप्रीम कोर्टाने दिलेल्या निकालानंतर या वादावर कायमस्वरूपी तोडगा निघाला आहे. निर्वासित बांगलादेशीयांना भारताचे नागरिकत्व देण्यावर सुप्रीमच्या निकालातून अखेर शिक्कामोर्तब झाले आहे. सर्वोच्च न्यायालयाने नागरिकत्व कायद्याचा '६ अ' विभाग घटनात्मकदृष्ट्या वैध असल्याचा निर्वाळा दिला. ७


दैनिक **राज्य लोकतंत्र**

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–१७९ | सोमवार, दि.२१ ऑक्टोबर २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये


### सी–व्हिजिल ॲपवर आचारसंहिता भंगाच्या ६६७ तक्रारी प्राप्त

मुंबईः राज्यात विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी १५ ऑक्टोबर २०२४ पासून आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. १५ ते २० ऑक्टोबर २०२४ पर्यंत राज्यभरात सी–व्हिजिल ॲपवर एकूण ६६७ तक्रारी प्राप्त झाल्या असून त्यापैकी ६६० तक्रारी निवडणूक आयोगाकडून निकाली काढण्यात आल्या आहेत. म्हणजे एकूण ९९ टक्के तक्रारी निकाली काढण्यात आल्या आहेत अशी माहिती राज्याचे अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी डॉ. किरण कुलकर्णी यांनी दिली. सजग नागरिकांना आचारसंहिता पालनासाठी सहकार्य करणारे सी–व्हिजिल ॲप हे कोणत्याही ॲपस्टोअरमधून डाऊनलोड करता येते.

# शेती महामंडळाची ५.४८ हेक्टर जमीन शिर्डी संस्थानला मोफत

## वित्त विभागाच्या विरोधाला केराची टोपली

**पुणे । प्रतिनिधी**

**काही दिवसांपूर्वी पुण्यातील कसब्याचे काँग्रेस आमदार रवींद्र धंगेकर यांनी पुण्यातील शासकीय जमिनीवरून थेट महसुल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यावर आरोप केले होते. या आरोपावरून वातावरण तापले असतानाच आता राहता तालुक्यातील निमगाव कोऱ्हाळे येथील राज्य शेती महामंडळाची जमीन फुकटात शिर्डी संस्थानला देण्यात आली आहे. विशेष म्हणजे या निर्णयाला वित्त विभागाने विरोध करताना जमीनचा मोबदला घेऊनच संस्थानला देण्यात यावा, असा शेरा विभागाने मारला होता. पण महसुल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या आशीर्वादाने शिर्डी संस्थानला १३ कोटी ७० लाख रुपयांची जमीन मोफत मिळाली आहे. यावरून सध्या राज्यातील राजकारण तापलेलं आहे.**

राहता तालुक्यातील निमगाव कोऱ्हाळे येथील शेती महामंडळाची ५.४८ हेक्टर जमीन राज्य सरकारने जून २०२३ मध्ये ग्रामपंचायतीला दिली होती. ती ५.४८ हेक्टर जमीन शिर्डीच्या साईबाबा संस्थानला मोफत देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. तर हा निर्णय महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या आग्रहाखातर थेट मोफच देण्यात आल्याचा आरोप आता केला जात आहे. महसूलमंत्री विखे पाटील यांच्या, शिर्डीत सुसज्ज क्रीडा संकुलाची उभारणी करण्यासाठी शिर्डीच्या साईबाबा संस्थानने जागेची मागणी केली होती. यासाठी राज्य सरकारने जून २०२३ मध्ये महामंडळाची ५.४८ हेक्टर जमीन ग्रामपंचायतीला दिली होती. यानंतर सदरची जागा मंजूर योजनेसाठी योग्य नसून ती महामंडळास परत करण्यात यावी असे जिल्हाधिकाऱ्यांनी म्हटले होते. यानंतर सप्टेंबर २०२४ मध्ये पुन्हा या जागेवरून नवा प्रस्तावर जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर करण्यात आला. ज्यात सदर जमीन साईबाबा संस्थानला प्रचलित बाजारमूल्यानुसार (रेडीरेकनर) देण्यात यावी असा प्रस्ताव ठेवण्यात आला होता. तर बाजारमूल्यानुसार या जमिनीची किंमत १३ कोटी ७० लाख रुपये झाली होती. ही रक्कम घेऊन ◀◀ पान २ वर

## मविआचा जागा वाटपाचा तिढा कायम

### सर्वांनीच आघाडी धर्माचे पालन करावे – संजय राऊत



**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्यात विधानसभा निवडणुकीसाठी इच्छुकांच्या नेत्यांशी गाठीभेटी सुरू आहेत. महाविकास आघाडीत काँग्रेस आणि ठाकरे गटात जागा वाटपावरून जोरदार रस्सीखेच सुरू आहे.**

शनिवारी ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत आणि काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्यातील मतभेद समोर आले होते. तर आमच्यात कोणताच वाद नाही, असे स्पष्ट करत दोन्ही नेत्यांनी सारवासारव करण्याचा प्रयत्न केला होता. दरम्यान, ◀◀ पान २ वर

### आजच्या संयुक्त पत्रकार परिषदेत जागावाटप जाहीर होणार

महाविकास आघाडीची सोमवारी (२१ ऑक्टोबर) संयुक्त पत्रकार परिषद होणार आहे. या पत्रकार परिषदेत जागावाटप जाहीर होणार आहे. कोणता पक्ष किती जागांवर लढणार याचा निर्णय या पत्रकार परिषदेत जाहीर केला जाणार आहे. आमचे सगळे ठरले आहे. त्यामुळे जागावाटप जाहीर करणार असल्याची माहिती शिवसेना ठाकरे गटाचे खासदार अनिल देसाई यांनी दिली.

# भाजपची पहिली यादी जाहीर

## ९९ जागांवर उमेदवारांची घोषणा



**मुंबई । प्रतिनिधी**

**भाजपने महाराष्ट्र विधानसभेसाठी पहिल्या ९९ उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. या यादीत पहिले नाव उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे असून ते त्यांचा पारंपारीक मतदारसंघ नागपूर दक्षिण पश्चिममधून रिंगणात उतरतील. याचबरोबर कोल्हापूर दक्षिणमधून अमल महाडीक यांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे.**

राज्यात सध्या विधानसभा निवडणुकीला रंग चढताना दिसत आहे. विविध पक्षांमधून ऑउट गोईंग सुरू झाले असून नेत्यांचे ◀◀ पान २ वर

### केज मधून आ.नमिता मुंदडा दुसऱ्यांदा उमेदवार



भाजपने जाहीर केलेल्या ९९ उमेदवारांच्या यादीमध्ये बीड जिल्ह्यातून केजच्या आमदार नमिता मुंदडा यांची वर्णी लागली आहे. नमिता मुंदडा या सध्याच्या आमदार असून, भाजपकडून त्यांना यंदा उमेदवारी देत दुसऱ्यांदा संधी दिली आहे. केज मतदारसंघ हा अनुसूचित जातीसाठी राखीव मतदारसंघ आहे. गेल्या पाच वर्षाच्या काळामध्ये नमिता मुंदडा यांनी मतदार संघातील कामांसाठी सर्वाधिक निधी खेचून आणला ज्यातून बरीच विकास कामे मार्गी लागली. नमिता मुंदडा यांची उमेदवारी घोषित झाली असून आता त्यांच्या विरोधामध्ये महाविकास आघाडीकडून अर्थात शरद पवार यांच्याकडून कोणाला उमेदवारी दिली जाते याबाबत उत्सुकता लागली आहे. दरम्यान बीड जिल्ह्यातील आणखी एक जागा भाजपच्या वाट्याला येते मात्र ती गेवराईची की आष्टीची याबाबत चर्चा सुरू असल्याने, दुसऱ्या उमेदवाराची घोषणा या यादीमध्ये करण्यात आलेली नाही.

### १३ महिलांना संधी

भाजपने पहिल्या यादीत १३ महिलांना संधी दिली आहे. ज्यात भोकरमधून खासदार अशोक चव्हाण यांच्या कन्या श्रीजया चव्हाण यांना उमेदवारी देण्यात आली आहे. श्वेता महाले (चिखली), मेघना बोर्डीकर (जिंतूर), अनुराधाताई चव्हाण (फुलंबरी), सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), सुलभा गायकवाड (कल्याण पूर्व), मंदा म्हात्रे (बेलापूर), मनिषा चौधरी (दहिसर), विद्या ठाकूर (गोरेगांव), माधुरी मिसाळ (पर्वती), मोनिका राजले (शेवगावं), प्रतिभा पाचपुते (श्रीगोंदा), नमिता मुंदडा (केज) यांच्या नावाचा समावेश आहे.

### आ.रोहीत पवार विरोधात राम शिंदे

अशीच लढ कर्जत जामखेड मतदार संघात देखील पाहायला मिळेल. येथे आमदार रोहीत पवार यांना टक्कर देण्यासाठी भाजपने राम शिंदे यांना तिकीट दिले आहे. तर याआधीच राम शिंदे यांनी रोहीत पवार यांच्याव्रोधात थोपाटले दंड होते. आतातर तिकीट जाहीर झाले आहे. यामुळे या हाय होल्टेज लढतींसह राज्यात काय होणार याकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

## ज्योतीताई मेटे यांचा शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश

### बीडमधून निवडणूक लढवणार असल्याच्या चर्चा?

गेल्या काही दिवसांपूर्वी ज्योती मेटे यांनी मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली होती. लोकसभा निवडणुकीच्या वेळीही त्यांनी शरद पवार गटासोबत चर्चा केली होती. आता त्यांनी थेट शरद गटात प्रवेश केला आहे. त्यामुळे त्यांना शरद पवार गटाकडून बीडमधून उमेदवारी देण्यात येणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

**मुंबई । प्रतिनिधीं**

आगामी निवडणुकीच्या अनुषंगाने राज्यात घडामोडींना वेग आला आहे. उमेदवार, मतदारसंघ चाचपणी देखील पक्षांकडून सुरू आहेत. संभाव्य उमेदवारी मिळणाऱ्या पक्षांत उमेदवार पक्षप्रवेश करताना दिसत आहेत. अशातच दिवंगत नेते विनायक मेटे यांच्या शिवसंग्राम संघटनेच्या नेत्या ज्योती मेटे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटात प्रवेश केला असून त्यांना बीडमधून उमेदवारी देण्यात येणार असल्याची चर्चा आहे. रविवारी त्यांनी शरद पवार यांच्या उपस्थित पक्षात प्रवेश केला. विनायक मेटे



यांच्या निधनानंतर शिवसंग्राम संघटनेची जबाबदारी ◀◀ पान २ वर

## राजेंद्र मस्केंची भारतीय जनता पार्टीला सोडचिट्ठी

### लवकरच राजकीय निर्णय घेणार –राजेंद्र मस्के

**बीड । प्रतिनिधी**

**भारतीय जनता पार्टीचे लोकप्रिय जिल्हाध्यक्ष श्री. राजेंद्र मस्के यांनी आज संघर्षयोद्धा जनसंपर्क कार्यालय बीड येथे शेकडो कार्यकर्त्यांच्या साक्षीने भारतीय जनता पार्टीला सोडचिट्ठी देऊन भाजप मुक्त होण्याचा निर्णय जाहीर केला आहे.**



मा. पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वात विश्वास व्यक्त करून, भारतीय जनता पार्टीत प्रवेश केला. पक्षाने जिल्हाध्यक्ष पदाची दिलेली जबाबदारी अथक परिश्रम घेऊन प्रामाणिकपणे निभावली. पक्ष विचार, पक्षाचे कार्यक्रम सामान्य जनतेपर्यंत पोहचून पक्ष विस्तारासाठी तन मन धनाने काम केले. जिल्ह्याच्या कानाकोपऱ्या पर्यंत पक्षाचा कार्यक्रम व पक्षाचे नाव पोहोच केले. परंतु दुर्दैवाने भारतीय जनता पार्टीच्या वरिष्ठ नेतृत्वाने कामाची दखल घेतली नाही. उलट दुजाभाव करत विरोधकावर मर्जी दाखवून कोठ्यावधीचा निधी देऊन, त्यांना बळ देण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला गेला. राजकीय आणि विकास कामातही भाजपा पदाधिकाऱ्यांची दखल सत्ता असताना देखील घेतली गेली नाही. लोकसभा निवडणुकीत लोकनेत्या पंकजाताई यांच्या विजयासाठी प्रतिकूल सामाजिक परिस्थितीत यंत्रणा उभी केली. विजयासाठी ◀◀ पान २ वर

## कोणत्याही परिस्थितीत विधानसभा लढविणारच–अनिल जगताप

### उद्यापासून प्रचार दौऱ्याला प्रारंभ; बीड मतदार संघातील कुटुंबियांच्या घेणार भेटी!

**बीड । प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकांच्या रनधुमाळी सुरु झाल्या आहेत. बीड मतदार संघात सध्या अनिलदादा जगताप यांना मोठया प्रमाणात पसंती देण्यात येत असून अनिलदादा यांच्या प्रचार दौऱ्याची उत्सुकता शिगेला पोहचली असल्याचे दिसून येत आहे. अनिलदादा जगताप यांचे समर्थक, सहकारी, कार्यकर्ते देखील मोठ्या उत्साहात प्रचार दौऱ्याचे नियोजन करून आहेत. अनेक वर्षांपासून जनतेच्या सेवेसाठी



अहोरात्र तत्पर असणाऱ्या अनिलदादांना दादा तुम्ही आमदार व्हा, अशी आर्तहाक बीडकर देत आहेत. याच आर्तहाकेला ओ देऊन अनिलदादा जगताप महाराष्ट्राची धाकटी पांढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्री क्षेत्र नारायण गडाचे दर्शन घेऊन आपल्या प्रचार दौऱ्याचा आरंभ करत आहेत. येत्या मंगळवारी दि. २२ रोजी सकाळी श्री नगद नारायणाचे आशीर्वाद घेऊन अनिलदादा जगताप नवगण राजुरी सर्कलमधील सर्व गावांना भेटी देणार ◀◀ पान २ वर

## राम मंदिराचा निकाल देताना देवाकडेच मदत मागितली

### सरन्यायाधीश डी वाय चंद्रचूड यांची स्पष्टोक्ती

**पुणे । प्रतिनिधी**

**पूर्वजांच्या पुण्याईमुळे मी इथपर्यंत प्रवास केला. तर यमाई देवीच्या कृपेने भारताचा सरन्यायाधीश झालो. न्यायालयात काम करताना अनेक वेळा अशी प्रकरण समोर येतात की, ती सोडवणे अवघड असतात. माझी अशीच अवस्था अयोध्येतील रामजन्मभूमी प्रकरणाचा निकाल देताना झाली. अयोध्येतील रामजन्मभूमीचा खटला माझ्यासमोर सुरु होता. तीन महिने त्यावर सुणावनी सुरु होती. शेकडो वर्षे जो वाद सोडवू शकले नव्हते. तेच प्रकरण आमच्यासमोर ठेपले होते. त्यावेळी यातून मार्ग कसा शोधायचा असा प्रश्न आमच्यासमोर होता. मी खटल्याचा निकाल देण्यापूर्वी देवाची पूजा करताना देवाकडेच मदत मागितली होती, असे सरन्यायाधीश डी वाय चंद्रचूड म्हटले आहे.**



सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश डी वाय चंद्रचूड सिंग हे रविवारी पुण्यात एका कार्यक्रमाला आले होते. त्यावेळी बोलताना मागील अनेक ◀◀ पान २ वर

### बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.१७ ऑक्टोबर २०२४**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ८.०० क्विंटल | २,४२१ | २,५४० | २,४८७ |
| ज्वारी/हायब्रिड :४२.५० क्विंटल | १,६२५ | २,७११ | २,१८१ |
| मका/लोकल :५.५० क्विंटल | २,४५० | २,४५० | २,४५० |
| तूर :७.५० क्विंटल | ८,६०० | ८,६०० | ८,६०० |
| उडीद :२०.०० क्विंटल | ५,२०० | ७,६०० | ६,७३४ |
| बाजरी: ४.०० क्विंटल | २,५०० | २,५०१ | २,५०० |
| मुग : १०.५० क्विंटल | ६,६९० | ७,१०० | ६,९६४ |
| सोयाबीन: ७५३.०० क्विंटल | ३,००० | ४,४०० | ४,०२९ |
| हरभरा: ०.५० क्विंटल | ६,५५० | ६,५५० | ६,५५० |

## मनोज जरांगेंचे पॉवर पॉलिटिक्स; महायुती, महाविकाससह वंचितला शह?

**जालना । प्रतिनिधी**

**महाराष्ट्र विधानसभा निवडणूकीसाठी संपुर्ण राज्यामध्ये रणधुमाळी सुरु आहे. या धर्तीवर मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मोठी घोषणा केली आहे. आंतरवली सराटी येथे बोलताना ते म्हणाले, जिथे मराठा समाजाचा उमेदवार निवडून येण्याची शक्यता आहे तेथेच उमेदवार देऊ. तसेच राहिलेल्या ठिकाणी दुसरा उमेदवार देऊन इतर जागा पाडण्यावर भर देणार असे ते बोलले आहेत. तसेच मराठा**



**समाजाला संपवण्याचे कारस्थान करणाऱ्यांना आम्ही या निवडणूकीमध्ये संपवू असा इशारा देखील त्यांनी पुन्हा एकदा दिला आहे.**

### जरांगे यांच्या घोषणा

१) राज्यातील ज्या मतदार संघातून मराठा उमेदवार निवडून येऊ शकतो तिथे अपक्ष उमेदवार रिंगणात उतरवणार, जातीची समीकरणे उमेदवार निवडून येण्यासाठी जुळवणार. २) राज्यातील आरक्षित जागेवर एस.सी, एस.टी. च्या जागेवर जो उमेदवार आमच्या मागण्यांशी सहमत आहे असे बॉण्डवर लिहून देईल तिथे त्याला मराठा समाज मतदान करणार. ३) जिथे आम्हाला उमेदवार उभे करायचे नाहीत तिथे आमच्या विचारांशी साधर्म असलेल्या उमेदवाराने बाँड वर आमच्या मागण्याशी सहमत असल्याचे लिहून द्यावे,त्याला आम्ही मतदान करू.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांवर टीका करताना ते म्हणाले की, इंग्रज बाहेरचे होते तुम्ही आमचे हिंदू असतानादेखील इतके क्रुर का आहात? देवेंद्र फडणवीस सारखा माणूस पाहिला नाही. आम्हाला संपवायला निघाले आहेत. पण आम्ही त्यांना संपवण्यासाठी तयार असल्याचे जरांगे पाटील म्हणाले. आता समाजाच्या हिताचा निर्णय घ्यावा लागेल. सगळ्यांची भावना उमेदवार उभे करण्याची आहे. समाजाचा मी चौफेर विचार केला आहे, त्यामुळे सावधगिरीची भूमिका आम्ही घेतली आहे. ◀◀ पान २ वर

cmyk

अग्रलेख

# जगा आणि जगू द्या : हेच भारताचे तत्त्वज्ञान

बांगलादेशामधून भारतात आलेल्या निर्वासितांसाठी १७ नोव्हेंबरचा दिवस जणू सोनियाचा दिन ठरला. अनेक वर्षांच्या प्रतीक्षेनंतर निर्वासित बांगलादेशीयांना भारताचे नागरिकत्व प्राप्त झाले आहे. निर्वासित बांगलादेशीयांचे भारतातील वास्तव्य हा अनेक वर्षांपासून वादाचा मुद्दा बनला होता. सुप्रीम कोर्टाने दिलेल्या निकालानंतर या वादावर कायमस्वरूपी तोडगा निघाला आहे. निर्वासित बांगलादेशीयांना भारताचे नागरिकत्व देण्यावर सुप्रीमच्या निकालातून अखेर शिक्कामोर्तब झाले आहे. सर्वोच्च न्यायालयाने नागरिकत्व कायद्याचा '६ अ' विभाग घटनात्मकदृष्ट्या वैध असल्याचा निर्वाळा दिला. या विभागान्वये १ जानेवारी १९६६ ते २५ मार्च १९७१ या काळात आसाममध्ये आलेल्या स्थलांतरितांना भारतीय नागरिकत्व देण्याची तरतूद आहे. न्यायालयाच्या पाच सदस्यीय खंडपीठाने चार विरुद्ध एक मतांनी ही तरतूद उचलून धरली. बेकायदा स्थलांतरितांच्या समस्येवर 'आसाम करार' हा राजकीय उपाय होता, अशी टिप्पणी सरन्यायाधीशांनी निकालात केली.

नागरिकत्व कायद्यामध्ये विभाग '६ अ'ची विशेष तरतूद नंतर करण्यात आली. तत्कालीन राजीव गांधी सरकार आणि 'आसू' या संघटनेत झालेल्या आसाम करारांतर्गत हा विभाग कायद्यात समाविष्ट झाला होता. नागरिकत्व कायद्यामधील '६ अ' तरतूद वैध ठरवताना सरन्यायाधीश म्हणाले की, राज्याचा लहान आकार आणि परदेशातील नागरिक ओळखण्याची गुंतागुंतीची प्रक्रिया पाहता स्थलांतरितांची संख्या इतर राज्यांच्या तुलनेत अधिक आहे. न्या. एम. एम. सुंदरेश, न्या. मनोज मिश्रा तसेच न्या. सूर्यकांत यांनी सरन्यायाधीशांना सहमती दर्शवली, तर न्या. जे. बी. पारडीवाला यांनी मात्र '६ अ' विभाग वैध नसल्याचे मत नोंदविले. घटनापीठाचे सदस्य असलेल्या न्या. पारडीवाला यांनी निकालाच्या विरोधात वेगळे मत नोंदविले. या तरतुदीचा बनावट कागदपत्रांद्वारे गैरवापर होण्याची शक्यता अधिक असल्याचे त्यांनी जोडलेल्या टिप्पणीत म्हटले आहे. विभाग '६ अ'मधील तरतुदींत वेळेची कुठलीही मर्यादा नाही. विशिष्ट तारखेपर्यंत प्रक्रिया पूर्ण करण्याबाबत उल्लेख नाही. त्यामुळे बनावट कागदपत्रांद्वारे चुकीची तारीख दाखवून नागरिकत्व घेतले जाऊ शकेल, असे न्या. पारडीवाला यांचे मत आहे. सुप्रीमच्या न्यायाधीशांमध्ये एकमत झाले नसले चार विरुद्ध एक अशा मतांनी हा ठराव मंजूर झाल्याने निर्वासित बांगलादेशी आता कायद्याने अधिकृतपणे भारतीय होणार आहेत. निर्वासित बांगलादेशी ही समस्या आजची नसून तब्बल अर्धशतकापूर्वीची समस्या होती. या वादावर आता अर्धशतकीय वाटचालीनंतर तोडगा निघाला आहे. तरी आसाम व पश्चिम बंगालच्या राजकारणावर सुप्रीम कोर्टाच्या या निर्णयाचा दूरगामी परिणाम होणार आहे. बांगलादेशातून भारतात अनधिकृतरीत्या येण्याचे व अवैधरीत्या वास्तव्य करण्याची प्रकरणे आजही सुरू असून त्या त्या राज्यातील पोलिसांकडून अनधिकृत बांगलादेशीयांची शोध मोहीम राबविण्यात येत असते. १९८५ मध्ये आसाम करारामध्ये नागरिकत्व कायद्याचे कलम ६ ए जोडण्यात आले होते. या कायद्यानुसार १ जानेवारी १९६६ ते २५ मार्च १९७१ दरम्यान आसाममध्ये आलेले बांगलादेशी स्थलांतरित भारतीय नागरिक म्हणून आपली नोंदणी करू शकतात. तथापि, २५ मार्च १९७१ नंतर आसाममध्ये येणारे परदेशी भारतीय नागरिकत्वासाठी पात्र नाहीत. कलम ६ एची घटनात्मक वैधता या निकालाने कायम ठेवण्यात आली आहे. आम्ही कोणालाही शेजारी निवडण्याची परवानगी देऊ शकत नाही आणि ते बंधुतेच्या तत्त्वाच्या विरोधात आहे. जगा आणि जगू द्या हे आमचे तत्त्वज्ञान आहे, हे सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाने पुन्हा एकवार स्पष्ट झाले आहे. आसाममधील ४० लाख स्थलांतरितांचा प्रभाव पश्चिम बंगालमधील ५७ लाख स्थलांतरितांपेक्षा जास्त आहे. कारण आसाममधील जमीन पश्चिम बंगालच्या तुलनेत खूपच कमी आहे. पश्चिम बंगालमध्ये बांगलादेशातून आलेला मतुआ समुदायाचे हिंदू निर्वासित अनेक वर्षांपासून नागरिकत्वाची मागणी करीत होते. देशात त्यांची संख्या ३-४ कोटी आहे. यापैकी २ कोटी बंगालमध्ये आहेत. या समुदायाचा राज्यातील १० लोकसभा आणि ७७ विधानसभा जागांवर राजकीय प्रभाव आहे. सीएए लागू झाल्यामुळे सुप्रीम कोर्टाच्या निर्णयामुळे त्यांना आता कायमस्वरूपी नागरिकत्व मिळणार आहे. भाजपाने २०१९ मध्ये सीएएच्या आश्वासनावर ४२ पैकी १८ जागा जिंकल्या होत्या. २०१४ मध्ये त्या ३ होत्या. २०२१ च्या निवडणुकीत भाजपा दुसऱ्या क्रमांकावर होता. आसाममध्येही २० लाखांवर हिंदू बांगलादेशी बेकायदा वास्तव्य करीत आहेत. आसामच्या एकूण ३.५ कोटी लोकसंख्येत अनेक जागांवर बांगलादेशातून आलेल्या निर्वासितांचा प्रभाव आहे.

# ज्वारी पेरणीची लगबग व पहाटेचे दवबिंदू...

***सा**धारणता भाद्रपद महिन्यातला पक्ष पंधरवडा लागला की सर्व शेतकऱ्यांना रब्बी हंगामाची चाहूल लागलेली असते रब्बी पेरणीसाठी काही शेतकरी हे जमिनी राखून ठेवतात तसेच या दिवसात या जमिनीला मशागत करतात यामध्ये मोगडणे ,पाळी घालणे, काश्या वेचने ,ही कामे आटपून साधारणता अश्विन महिन्याच्या पहिल्या आठवड्यापासूनच पेरणीला सुरुवात करतात .यावेळी पावसाने उघडीप दिलेली असते. शिवाय जमिनीत पेरण्यायोग्य वापसाही झालेला असतो मग या काळ्या आईची ओटी भरण्यासाठी शेतकरी सज्ज असतो .ज्वारी ,गहू ,हरभरा, जवस हे शेतकऱ्यांचे नगदी पीक म्हणून ओळखले जाते.*





ज्वारीचे वाण....ज्वारीचे पीक जोमात यावे म्हणून काही शेतकरी दगडी ज्वारी , पांढरी ज्वारी व हूरड्यासाठी लागणारी गुळ भेंडी या प्रकारच्या ज्वारीची पेरणी करतात .ज्वारीच्या पेरणीसाठी ठेवलेल्या धान्याला शेतकरी गंधक व गोमूत्र चोळून पेरणी करतात यामुळे पेरलेले बी हे संपूर्णपणे उगवते ,त्याची तूट होत नाही म्हणून बियाची काळजी घ्यावी लागते .

रब्बी हंगामात ज्वारीची पेरणी करण्यासाठी शेतकरी तिफण या यंत्राचा वापर करतात एका औताला तीन जानोळे व तीन फारुळे बसून त्याला तीन बांबूची नळी बसवतात वर भांड्यागत गोल आकाराचे लाकडाचे चाडे असते या चाड्याला बरोबर तीन छिद्रे असतात या चाड्यावर ओंजळ भरू जोंधळे घेऊन ती मूठ चाड्यावर समप्रमाणात सोडली की याची पेरणी योग्य होते चाड्या वरची मूठ सोडणे म्हणजेच योग्य पेरणी करणे. या पेरणीलाही एक तंत्र आहे हे सर्व शेतकऱ्यांना अवगत असतं आणि ही पेरणी केली ही या तिफणीच्या पाठीमागे रासनी म्हणून बैलाच्या साह्याने पाळी घातली जाते यामुळे पेरलेले बी उघडे पडत नाही. पक्षी ते खात नाहीत पूर्ण ते जमिनीखाली जातात आणि पूर्ण उगवतात .

**वातावरण.....**

पेरणीच्या हंगामामध्ये दुपारी कडक ऊन पडलेलं असतं तर रात्री आकाश निरभ्र झालेल असत,आणि आकाशात पूर्ण चांदने पडलेल असते .याबरोबरच पहाटे थंड हवा सुटते वाऱ्याची झुळूक येते एकंदरीतच या महिन्यातले म्हणजेच पेरणीच्या दिवसातले हे दिवस शेतकऱ्यांसाठी अल्हादायक असतात या महिन्यामध्ये सर्व शेतकरी हे आपल्या काळ्या आईची ओटी भरण्यासाठी म्हणजेच पेरणी करण्यासाठी कामात गुंतलेले असतात काही काही शेतकरी दोन किंवा तीन एकत्र येऊन सामूहिकरीत्या रब्बी हंगामात पेरणी करतात या एकत्र येण्याच्या प्रक्रियेला सावड करणे असे म्हणतात बोलता बोलताच एक दुसऱ्याला विचारतात कशी चालली पेरणी त्यावेळेस समोरचा उत्तर देतो आता काही टेन्शन नाही सावड केलेली आहे आणि सर्व शेतकरी या शेत मशागतीत रब्बी हंगामात ज्वारी पेरण्यात गुंग झालेली असतात. दुपारचे जेवण आणि आनंद....

दुपार झाल्यानंतर शेतकरी जेवणासाठी पेरणी थोडी थांबवतात यावेळी कारभारीन भरलेलं टोपलं डोक्यावर घेऊन आलेली असते. या टोपल्यामध्ये भाकरी ,ताक , ठेचा अधि पदार्थ घेऊन दुपारच्या जेवणाची सोय करतात. यावेळी लिंबाच्या झाडाखाली सोडलेली तिफन बैलांना टाकलेला चारा आणि शेतकऱ्यांची जेवणाची मेजवानी हा आनंद काही वेगळाच असतो जेवणाला पेरणी बरोबर असणारे इतरही सहकारी असतात अगदी गप्पागोष्टी मध्ये या जेवणाचा आनंद शेतकरी आपले मित्र बरोबर घेतात त्यांच्यासाठी ते रोजचेच जरी असलं तरी आपल्यासाठी मात्र ती एक वेगळी पंगत किंवा गंमत वाटते

**पहाटचे दव बिंदू .......**

या महिन्यात निसर्ग भल्या पहाटे आपल्या ओंजळीतून दोबिंदू सोडतो .हे शेतकऱ्यांसाठी फायद्याचे असते या दव बिंदूच्या अल्हादायक पाण्यामुळेच शेतात पेरलेले बी हे उगवले जाते तसेच ज्वारीच्या पेरणीच्या दिवसात बैलांसाठी काबाडकष्ट असते म्हणून काही तुरळक ठिकाणी या बैलांना चरण्यासाठी वेगळा बांध किंवा चारा ठेवलेला असतो या बांधावर पवना हे बैलांना आवडणारे गवत असते त्याची भरपूर वाढ झालेली असते ते चारण्यासाठी शेतकरी राजा तांबडं फुटतात बैलांना सोडून त्या वाढवलेल्या गवताच्या बांधावर चरण्यासाठी सोडतात या बैल चारण्याच्या वेळीच दव बिंदू सांडले जातात त्यावेळी लागणारा गारवा आणि हवेमुळे माणसाचे मन हे अल्हादायक झालेला असते. दिवसभराचे काबड कष्ट आणि शारीरिक झालेला त्रास या दव-बिंदूमुळे काही वेळ शेतकरी राजा विसरून गेलेला असतो. खरोखरच ज्वारीची पेरणी म्हणजेच एक आभूतपूर्व अशी शेतकऱ्यांची योजना असते अगदी आनंदामध्ये रममान होऊन शेतकरी राजा आपल्या काळ्या आईची ओटी भरन्यामध्ये व्यस्त असतो



महादेव साळुंके, कवडगाव
मो.९९६०३७२७२४

# नाथापूर येथे वीज पडून एकाचा मृत्यू

**बीड । प्रतिनिधी**

**नाथापुर येथे विजांच्या कडकडासह पाऊस चालू असताना वीज पडून एकाचा मृत्यू झाला.**



नाथापूर येथील शेतकरी कुटुंबातील संतराम अण्णासाहेब देवडकर हे आपल्या शेतामध्ये कापूस वेचानिकरिता गेले असता अचानक विजांच्या गड गडासह पावसाची सुरुवात झाली त्यामुळे त्यांनी लिंबाच्या झाडाचा असरा घेतला त्याच वेळी विजेचा मोठा आवाज होऊन लिंबाच्या झाडावर वीज कोसळली व या शेतकऱ्याचा जागीच मृत्यू झाला.त्यांच्या पश्चात त्यांना तीन मुलं आई आणि पत्नी असा परिवार आहे.अत्यंत शांत स्वभावाचे म्हणून नाथापूर येथे ते प्रसिद्ध होते.त्यांच्या निधनाने नाथापूर येथे शोककळा पसरली आहे.तरी शासनाने या शेतकऱ्यास तत्काळ आर्थिक मदत द्यावी अशी मागणी गावकऱ्यांकडून करण्यात येत आहे.

# रामेश्वर मंदिरामध्ये गाथा पारायणास भास्कर दानवे यांची भेट

**जालना । प्रतिनिधी**

**तालुक्यातील मौजपुरी येथील रामेश्वरी मंदिरामध्ये १०१ वो फिरते पारायण सोहळ्यानिमित्त ह. भ. प. ज्ञानेश्वर महाराज बारड यांच्या गाथा पारायण व कीर्तनास भाजपा जालना विधानसभा प्रमुख भास्कर आबा दानवे यांनी भेट दिली, याप्रसंगी रामेश्वरी मंदिर कमिटीच्या वतीने आबांचे स्वागत करून सत्कार करण्यात आला.**

जालन्यामधून २८ गावांनी यात सहभाग घेतला असून २५० हून अधिक लोक परायणास बसले आहेत. उपस्थित सर्व भाविक भक्तांना भाजपा जालना विधानसभा प्रमुख भास्कर आबा दानवे यांच्यावतीने सफरचंद व केळीच्या प्रसादाचे वाटप करण्यात आले. अतिशय भक्तिमय वातावरणात सुरू असलेल्या या गाथा पारायण सोहळ्याप्रसंगी भागवत बावणे, कपिल दहेकर, वसंत शिंदे, बद्रीनाथ भसांडे, निवृत्ती गायकवाड, निवृत्ती लंके, राम जाधव, विष्णू डोंगरे, मुकेश चव्हाण,



कैलास उबाळे, गोवर्धन कोल्हे, रामजी शेजुळ, गोपाल चौधरी, रामदास गायकवाड, दत्ता जाधव, सत्यनारायण ढोकळे, हरिभाऊ गोरे आदींसह मोठ्या संख्येने भाविक-भक्तांची व परिसरातील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# सैनिक रत्न पुरस्कार वितरण आणि सैनिक महामेळाव्यास उपस्थित राहा-नारायण अंकुशे

**बीड । प्रतिनिधी**

**गेल्या ७५ वर्षापासून देशातील आजी-माजी सैनिकांचा उपयोग फक्त मतापुरताच केला आहे. सैनिक आणि शहीद सैनिक परिवाराला त्यांच्या हक्कापासून वंचित ठेवले आहे.**

अशा विविध समस्याला वाचा फोडण्यासाठी आणि न्याय देण्यासाठी सैनिक महामेळावा आणि सैनिक रत्न पुरस्कार वितरण समारंभ आयोजन परिवर्तन महाशक्तीच्या घटक पक्ष भारतीय जवान किसान पार्टी ने दिनांक २१ ऑक्टोबर. २०२४ रोजी पुण्यातील बालगंधर्व नाट्यगृहात सकाळी ११ वाजता आयोजित केल्या असल्याची माहिती भारतीय जवान किसान पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष नारायण अंकुशे यांनी प्रसिद्धी पत्रका द्वारे दिली आहे. या सैनिक रत्न पुरस्कार वितरण आणि सैनिक महामेळाव्याला छत्रपती संभाजी महाराज मा मंत्री बच्चू कडू,माजी खा राजू शेट्टी,माजी आ वामनराव चटप माजी आ शंकरराव धोंडगे या मान्यवरांच्या शुभ हस्ते वितरण होणार असून सैनिकाच्या समस्या आणि उपाययोजना यावर उपस्थित मान्यवर मार्गदर्शन करणार आहेत. उपस्थित मान्यवरासह स्नेहभोजन अशी असुन दिनांक २१ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी अकरा वाजता पुणे येथील बालगंधर्व नाट्यगृहात आजी-माजी सैनिक शहीद सैनिक परिवार असंघटित कामगार आणि माता भगिनींनी मोठ्या प्रमाणावर उपस्थित राहावे असे आव्हान आयोजक नारायण अंकुशे यांनी केले आहे.

## पान १ वरून...

### शेती महामंडळाची ५.४८ हेक्टर

जमीन साईबाबा संस्थानला क्रीडा संकुल उभारण्यासाठी देण्याचा ठराव राज्य शेती महामंडळाने केला होता. तसा प्रस्तावही महसूल विभागास पाठवला होता. याच प्रस्तावावर वित्त विभागाने जमीन मोफत न देता राज्य शेती महामंडळाच्या ठरावाप्रमाणे विकत देण्यात यावी. महामंडळाच्या प्रस्तावाप्रमाणे संस्थानने १३ कोटी ७० लाख रुपये घ्यावेत. या व्यवहारात पैसे न दिल्यास सरकारचे मोठे नुकसान होईल, असे म्हणत वित्त विभागाने विरोध दाखवला होता. मात्र महसूलमंत्री विखे पाटील यांनी, शिर्डीत साईबाबा संस्थानने क्रीडा संकुलाची उभारणी केल्यास राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू तयार होण्यास मदत होईल. राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवरील स्पर्धांचे आयोजन येथे करणे शक्य होईल. यामुळे शेती महामंडळाची जागा संस्थानला मोफत देण्याचा नवा प्रस्ताव मंत्रिमंळासमोर सादर करण्याचे आदेश दिले होते. यानंतर आता राज्य शेती महामंडळ आणि वित्त विभागाचा विरोध डावलून ही जमीन शिर्डी संस्थानला मोफत देण्यात आली आहे.

-------------

### भाजपची पहिली

इनकनिंग देखील पाहायला मिळत आहे. यादरम्यान भाजपने डॅमेज कंट्रोल करण्यासाठी ९९ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली आहे. यात फडणवीस, राम कदम, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, रावसाहेब दानवे यांचे पुत्र संतोष दानवे यांच्यासह भोकरमधून खासदार अशोक चव्हाण यांच्या कन्या श्रीजया चव्हाण यांना उमेदवारी देण्यात आली आहे. या यादीत नव्या चेहऱ्यांसह जुन्या चेहऱ्यांनाही संधी देण्यात आली आहे. तर काही विद्यमान आमदारांचे तिकीट कापण्यात आले आहे.

**हाय होल्टेज लढती**

भाजपने ९९ उमेदवारांची लिस्ट जाहीर करत निवडणूक हाय होल्टेज करण्यासाठी तगडे उमेदवार दिले आहेत. गेल्या निवडणुकीत प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना संधी देण्यात आली नव्हती. पण पक्षाने यंदा त्यांना कामठी (जि.नागपूर) मतदारसंघांतून उमेदवारी दिली आहे. यावेळी विद्यमान आमदार टेकचंद सावरकर यांचा पत्ता पक्षाने कापला आहे.

------------

### मविआचा जागा

महाविकास आघाडीमध्ये अद्याप काही जागांवर तिढा कायम असून सर्वांनीच आघाडी धर्माचे पालन करावे, असे विधान राऊत यांनी केले आहे. शनिवारी १० तास चाललेल्या महाविकास आघाडीच्या बैठकीत जागा वाटपावर तोडगा निघू शकला नाही. या बैठकीनंतर माझी आणि शिवसेना प्रमुख उद्धव ठाकरे यांची चर्चा झाली. आम्हाला काही निर्णय घ्यावे लागणार असल्याने रविवारी शिवसेनेच्या नेत्यांची तातडीची बैठक बोलावली. तसेच मी उद्धव ठाकरे यांच्या परवानगीशिवाय काहीही बोलत नाही, असे राऊत म्हणाले.

----------

### राजेंद्र मस्केंची भारतीय जनता

कष्ठ घेतले. दुर्दैवाने पराभवानंतर व्यक्त केलेली शंका मनाला वेदना देणारी आहे. पराभवाचे खापर एकट्या मराठा समाजावर फोडून मोकळे झाले. मागील वर्षी बैलगाडा शर्यती दरम्यान प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या साक्षीने पंकजाताईंनी विधानसभेची उमेदवारी देण्याचे संकेत दिले. परंतु आज विधानसभा रणधुमाळी चालू असताना पक्षाने विचारपूस केली नाही. यावरून स्पष्ट येते की, भारतीय जनता पार्टीला राजकीय नकाशावर बीड जिल्ह्याची गरज उरलेली नाही. सर्व बळ आणि ताकत विरोधकांना देण्याचा संकल्प देवेंद्र फडणवीस यांच्या भाजपाने घेतला आहे. जिल्ह्यातील पक्ष हितासाठी प्राधान्य दिले गेले नाही. अशा नेतृत्वात काम करणे दुरापस्त आहे. म्हणून आज जिल्हाध्यक्ष पदासह भारतीय जनता पार्टीचा त्याग करत आहे. आगामी दोन तीन दिवसात योग्य तो राजकीय निर्णय घेतला जाईल.

-------------

### ज्योतीताई मेटे यांचा शरद पवारांच्या

ज्योती मेटे सांभाळत आहेत. पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून देखील त्यांची निवड करण्यात आलेली होती. लोकसभेपासून त्या उमेदवारीसाठी प्रयत्न करत होत्या. आता देखील त्यांनी विधानसभेसाठी चाचपणी सुरू केली होती, मात्र अचानक ज्योती मेटे यांनी शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. ज्योती मेटे यांच्यासह सलीम पटेल, बाळासाहेब खोसे यांनी देखील शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे.

----------

### राम मंदिराचा निकाल देताना देवाकडेच

वर्षापासून रखडलेल्या अयोध्येतील वादग्रस्त जमिनीप्रकरणी दिलेल्या निकालावर पहिल्यांदाच भाष्य केले. सरन्यायाधीश डी वाय चंद्रचूड म्हणाले की, अयोध्येतील वादग्रस्त जागेच्या निकालाच्या दिवशी मी देवासमोर मार्ग दाखव म्हणून बसलो आणि मला मार्ग मिळाला. त्यानुसार मी अयोध्येच्या राम मंदिर जागेचा निकाल दिल्याची कबुली यावेळी त्यांनी दिली. सर्वोच्च न्यायालयाच्या पाच न्यायमुर्तींच्या खंडपीठाने ९ नोव्हेंबर २०१९ रोजी राम जन्मभूमी जागेबाबतचा निकाल दिला. त्यानंतर राम मंदिर उभारणीचा मार्ग मोकळा झाला. सर्वोच्च न्यायालयाच्या त्या पाच सदस्यीय खंडपीठात न्यायमुर्ती रंजन गोगई, शरद बोबडे, धनंजय चंद्रचूड, अशोक भूषण, आणि एस अब्दुल नाजीर या पाच न्यायमुर्तींचा समावेश होता. यापैकी धनंजय चंद्रचूड हे सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश सध्या आहेत. पुढे बोलताना सरन्यायाधीश डी वाय चंद्रचूड म्हणाले की, दररोज जशी पूजा करतो तशीच पूजा मी त्या दिवशी करत होतो. मी भगवंतापुढे बसलो आणि म्हणालो आता तुम्हीच मार्ग सोधून द्या, तुमचा यावर विश्वास असेल, तुमची आस्था असेल तर देव तुम्हाला मार्ग शोधून देतात. देवानेही मलाही मार्ग दाखवला असे स्पष्ट केले. शेवटी सरन्यायाधीश म्हणाले, मी देशभर अनेक ठिकाणी फिरलो, तिथली मंदिर पाहिली. पण कन्हेसरचं यमाई देवीचं मंदिर मला खुप आवडतं. इतकं सुंदर मंदिर मी देशात मी देशात पाहिलं नसल्याचेही यावेळी आवर्जून नमूद केले.

------------

### कोणत्याही परिस्थितीत विधानसभा

आहेत. यानंतर दुसऱ्या सत्रात बीड शहरातील काही प्रभागातील कुटुंबियांच्या भेटी घेणार आहेत. शिवसेना पक्ष जी भूमिका घ्यायची ती भूमिका घेईल. मात्र अनिलदादा यांच्या झंजावताला येणाऱ्या २२ तारखेपासून सुरुवात होत आहे. अनिलदादा जगताप यांनी यापूर्वीही अनेकदा पत्रकार परिषदेत मी विधानसभा निवडणूक लढवणारच आहे, अशी भूमिका स्पष्ट केली होती. पक्षाची भूमिका कोणतीही असो मात्र बीडकरांच्या हितासाठी आणि बीडच्या विकासाचा कायापालट करण्याकरिता कार्यकर्ते आणि जनतेच्या आग्रहास्तव निवडणूक लढणार आहेत व यासाठीचेच पाहिले पाऊल म्हणजे अनिलदादा जगताप आपल्या प्रचार दौऱ्याचा आरंभ नारायण गडापासून करत आहेत. गेल्या सदोतीस वर्षांच्या राजकीय प्रवासात अनिलदादांनी शिवसेना आणि बाळासाहेबांच्या विचारांशी एकनिष्ठ राहिलेले आहेत व आजही हेच विचार घेऊन अनिलदादा जगताप आपला प्रचार दौरा सुरु करत आहेत. बीड मतदार संघात सध्या अनिलदादा जगताप यांना सर्वोपरी पोषक वातावरण तयार झालेले आहे. आजवर विधानसभा निवडणुकीत अनेकांना संधी दिली. मात्र यावेळी अनिलदादांना संधी देऊ असा सुर बीड मतदार संघात चांगलाच उमठला आहे. अशा परिस्थितीत अनिलदादा जगताप यांच्या प्रचार दौऱ्याला होत असलेला प्रारंभ विजयाची नांदी ठरणारा असणार आहे.

**बीडची जागा शिवसेनेलाच सुटणार; जनता आणि कार्यकर्त्यांच्या आग्रहास्तव मी निवडणुक लढवणार- अनिल जगताप**

वर्षानुवर्षे बीडची जागा शिवसेनेची आहे आणि ती शिवसेनेलाच सुटणार आहे. काहीजण या जागेवर अतिक्रमण करत असले तरी ही जागा शिवसेनेची आहे आणि ती शिवसेनेकडेच राहणार यात तिळमात्र शंका नाही. जनता आणि कार्यकर्ते यांच्या आग्रह आणि प्रबळ असणारी इच्छा लक्षात घेऊन मी निवडणूक कुठल्याही परिस्थितीत लढणार असल्याचे अनिलदादा जगताप यांनी प्रसिद्ध केलेल्या पत्रकात म्हंटले आहे.

---------

### मनोज जरांगेंचे पॉवर

जिथे मराठ्यांचे उमेदवार निवडून येतील तिथे मराठा उमेदवार उभा करणार. त्यासाठी जातीची समीकरणे जुळवावी लागणार आहेत. जिथे उमेदवार उभे करायचे नाहीत तिथे आमच्या विचाराशी साधर्म असलेल्या उमेदवाराने बाँड वर आमच्या मागण्याशी सहमत असल्याचे लिहून द्यावे. अर्ज मागे घेताना उमेदवारांना कळवले जाईल, कुणाचा अर्ज कायम ठेवायचा आणि कुणाचा मागे घ्यायचा हे जाहीर केले जाईल. ज्याने सांगूनही अर्ज मागे घेतला नाही, त्याने पैसे खाल्ले असे जाहीर केले जाईल, असे ते म्हणाले. अर्ज माघारी घेण्याच्या तारखेआधी राज्यातील किती मतदार संघ लढवायचे आणि कोणत्या ठिकाणी कोण माघार घेणार हे मी जाहीर करणार आहे. मला निवडणूक महत्वाची नाही माझ्या समाजाची शान महत्वाची आहे. राज्यातील कोणत्या मतदार संघात मराठा समाजाचा उमेदवार निवडून येऊ शकतो. हे समाजाच्या लोकांनी अंतरवालीत येऊन मला सांगावे, तिथे मी विचार करेन. गावात मतदान फुट्र देऊ नका, वाद करू नका, मतदान बूथ कॅप्चर करू देऊ नका. आम्ही डोके लावून त्यांचा भुगा करणार, असे नाव न घेता देवेंद्र फडणवीस यांना इशारा देखील मनोज जरांगे पाटील यांनी दिला. आम्हाला काही ठिकाणी उमेदवार पाडावे लागणार, काही ठिकाणी एस.सी, एस.टी. उमेदवार निवडून आणावे लागणार आहेत. आमच्याकडून अपक्ष म्हणून निवडून आलेला आमदार पळून गेला किंवा कुणाला जाऊन मॅनेज झाला तर त्याला बघून घेऊ असा, इशाराही त्यांनी यावेळी दिला.

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

सोमवार, दि.२१ ऑक्टोबर २०२४



## आष्टीत बुधवारी मुस्लिम बांधवांचा संवाद मेळावा

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी पाटोदा शिरूर विधानसभा मतदारसंघाचे माजी आ. भीमराव धोंडे यांच्या नेतृत्वाखाली बुधवारी आष्टी येथे मतदारसंघातील अल्पसंख्याक (मुस्लिम) समाज बांधवांच्या संवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.



याबाबत अधिक माहिती अशी की, मतदारसंघात अल्पसंख्याक मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने आहेत. अनेकजण शासनाच्या विविध योजनांपासून वंचित आहेत. त्यांच्या अनेक समस्या आहेत त्या जाणून घेण्यासाठी आणि त्यावर चर्चा करण्यासाठी या संवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे तरी आष्टी, पाटोदा, शिरूर विधानसभा मतदारसंघातील अल्पसंख्याक मुस्लिम समाजाचे कार्यकर्ते व समाजबांधवांनी लक्ष्मी लॉन खडकत रोड आष्टी येथे बुधवारी दिनांक २३ आक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन युवा नेते अजयदादा धोंडे मित्र मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

# शेतकऱ्यांसाठी 'समृद्धी' कारखान्याचा विस्तार, हजारो युवकांना मिळणार रोजगार

## दहा हजार मे. टन विस्तारीकरण प्रकल्पाचा मंगळवारी भूमिपूजन सोहळा

घनसावंगी । प्रतिनिधी

घनसावंगी तालुक्यात उसाचे क्षेत्र दिवसेंदिवस वाढतअसून अतिरिक्त उसाचा प्रश्न निर्माण झाल्यास शेतकऱ्यांचा उस बांधावर पडू नये, त्यांच्या उसाला न्याय आणि चांगला भाव मिळावा, म्हणून समृद्धी कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे पाटील व व्हाईस चेअरमन महेंद्र मेठी यांनी शेतकऱ्यांसाठी समृद्धी कारखान्याचा विस्तार करण्याचा निर्णय घेतला असून येणाऱ्या २२ ऑक्टोबर रोजी कारखान्याचा १० हजार मे. टन गाळप क्षमता असलेल्या विस्तारीकरण प्रकल्पाचे भूमिजन ऊस उत्पादक शेतकरी व कामगारांच्या हस्ते होणार आहे.





अशी माहिती कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे पाटील यांनी दिली.

शेतकऱ्यांच्या उसाला मराठवाड्यात उच्चांकी भाव देणारा कारखाना म्हणून 'समृद्धी'ची ओळख निर्माण झाली आहे. या शिवाय शेतकरी व समाजातील गरीब घटकांसाठी अभिनव योजना समृद्धी कारखाना राबवत असल्यामुळे जनसामान्य जनतेत कारखान्याची चांगली प्रतिमा तयार झाली आहे. येणाऱ्या काळात अतिरिक्त उसाचा संभाव्य प्रश्न लक्षात घेऊन समृद्धीने प्रस्तावित केलेला डिस्टिलरी प्रकल्प पुढे ढकलून शेतकऱ्यांच्या उसाला प्राधान्य देण्यासाठी हा निर्णय घेतला आहे. विस्तारीकरणानंतर प्रती दिन १० हजार मे. टन गाळप क्षमता होणार आहे. हा प्रकल्प आगामी गळीत हंगामात सुरु आहे. या विस्तारीकरण प्रकल्पाचे भूमिजन २२ ऑक्टोबर २०२४ रोजी होणार आहे. या भूमिपूजन सोहळ्यास कारखान्याचे सर्व सभासद शेतकरी, उसतोड यंत्रणाव सर्व विभागाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित राहणार आहे. या भूमिजन सोहळ्यास सर्व सभासद शेतकरी व जनतेनी उपस्थिती राहावे असे आवाहन सतीश घाटगे व सर्व संचालक मंडळाने केले आहे.

### विस्तारीकरणामुळे हजारो युवकांना रोजगार

सध्या समृद्धी कारखान्याची सध्याची गाळप क्षमता प्रती दिन ५ हजार मे. टन एवढी आहे. पुढच्या वर्षी ही क्षमता १० लाख मे. टन प्रती दिन एवढी होणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या उसाचे गतीने गाळप होऊन विक्रमी साखरचे उत्पादन होणार आहे. या विस्तारीकरण प्रकल्पामुळे घनसावंगी मतदारसंघातील अंबड, जालना आणि घनसावंगी तालुक्यातील हजारो युवकांना रोजगाराच्या संधी निर्माण होणारआहे.

### समृद्धीने स्वखर्चातून तयार केले ३२० किमीचे शेतरस्ते

शेतीला उद्योगाचा दर्जा मिळण्यासाठी वीज, पाणी आणि रस्ते या तीन बाबींची पूर्तता करणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांनी पिकविलेला शेतमाल शेतातून घरी आणि बाजारात नेण्यासाठी पक्के रस्ते होणे गरजेचे आहे. म्हणून समृद्धी कारखान्याने स्वखर्चातून ३२० कि.मी चे शेतरस्ते तयार करून दिले आहे. ही मोहीम १ हजार किमीचे शेतरस्ते खुले होईपर्यंत सुरु राहणार आहे. सभासद शेतकरी आणि उसतोड कामगारांच्या मुलीच्या लग्नासाठीमोफत एक क्विंटल साखर देणारा समृद्धी कारखाना हा महाराष्ट्रातील पहिला साखर कारखानाआहे.

## पहाडी पारगाव जि.प.शालेय समितीच्या अध्यक्षपदी ज्ञानदेव मुंडे तर उपाध्यक्षपदी बाळकृष्ण अंडील

**वडवणी । प्रतिनिधी**

धारूर तालुक्यातील पहाडी पारगाव येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा ही आठवीपर्यंत असून या शाळेच्या शाळा व्यवस्थापन समितीची नुकतीच नव्याने पुनर्रचना करण्यात आली यामध्ये सदस्य म्हणून श्री.पाटुळे वचिष्ट लक्ष्मण,श्री.अंडील गोविंद छत्रभुज,सौ.मंत्रे जयश्री रमेश, श्री.बाळकृष्ण पुरुषोत्तम अंडील,श्री.ज्ञानदेव धर्मराज मुंडे,श्री.मंत्रे विष्णू नामदेव, सौ.मुंडे सुनीता रमेश,सौ.साक्रुडकर अर्चना सुशेन,सौ.मस्के संजीवनी अर्जुन हे सर्व सदस्य निवडणूक प्रक्रियद्वारे बिनविरोध निवडून आले.



या सर्व शालेय समितीच्या सदस्यांची बैठक आयोजित करुन सर्वानमते शालेय समितीचे अध्यक्ष म्हणून ज्ञानदेव (बंडू) धर्मराज मुंडे तर उपाध्यक्ष म्हणून बाळकृष्ण पुरुषोत्तम अंडील यांची एक मताने निवड करण्यात आली.

नवनिर्वाचित शालेय समितीचे अध्यक्ष,उपाध्यक्ष व सर्व सदस्यांचे सरपंच बालासाहेब नाना अंडील,उपसरपंच हनुमंत बप्पा मुंडे,माजी सरपंच बंडूभाऊ मस्के,युवा नेते सटवा अंडील, ग्रामपंचायत सदस्य धर्मराज मुंडे तसेच शाळेचे कर्तव्यदक्ष मुख्याध्यापक साखरे सर यांनी हार, शाल,श्रीफळ देऊन सत्कार व अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीसाठी त्यांना शुभेच्छा दिल्या.


ही सर्व प्रक्रिया शांततेत पार पाडावी म्हणून गावचे सरपंच बालासाहेब नाना अंडील व उपसरपंच हनुमान बप्पा मुंडे तसेच शाळेचे कर्तव्यदक्ष मुख्याध्यापक साखरे सर यांनी प्रयत्न केल्याबद्दल शालेय समितीच्या वतीने आभार मानण्यात आले.

शाळेचे मुख्याध्यापक साखरे सर यांनी पालक व गावकऱ्यांनी सहकार्य केल्याबद्दल त्यांचे आभार मानले. या सत्कार सोहळ्याच्या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

## चारशे रुग्णांची तपासणी,मोफत नेत्र तपासणी शिबिर

अंबाजोगाई । प्रतिनिधी

आनंदऋषि नेत्रालय, अहिल्यानगर यांच्या वतीने रविवारी रोटरी कार्यालयात मोफत नेत्र तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते.या शिबिरात चारशे रुग्णांची नेत्र तपासणी करण्यात आली.यातील नेत्रदोष असणाऱ्या रुग्णांवर मोतीबिंदू व इतर शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत. नेत्र तपासणी शिबिराचे उद्घाटन प्रांतपाल सुरेश साबू व सौ.निर्मला साबू यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.यावेळी मोईन शेख,काळे,आनंद जाजू, सोळंकी, मोहिते,काळे यांची उपस्थित होते यावेळी बोलताना प्रांतपाल सुरेश साबू म्हणले की अंधत्व निर्मूलनाची मोहीम



हाती घेतली आहे.संपूर्ण तालुका अंधमुक्त करण्यासाठी आमचा (रोटरीचा) पाठपुरावा सुरूच राहणार आहे. ही मोहीम वर्षभर राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी आनंदऋषि नेत्रालय यांचा समुह नेत्र विशारद कुंडलिक राठोड,किरण कवडे यांनी चारशे जणांची नेत्र तपासणी केली. यातील नेत्रदोष असणाऱ्या रुग्णांवर

### दर महिन्याच्या दुसऱ्या रविवारी मोफत नेत्र तपासणी शिबिर

आनंदऋषि नेत्रालय यांच्या वतीने दर महिन्याच्या दुसऱ्या रविवारी मोफत नेत्र तपासणी शिबिर घेण्यात येईल. रोटरी कार्यालय बन्सीलाल नगर येथे सकाळी दहा ते दोन पर्यंत सुरू राहील.अशी माहिती देण्यात आली आहे.

अहिल्यानगर येथील आनंदऋषि नेत्रालय येथे मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया व इतर आवश्यक शस्त्रक्रिया होणार आहेत. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुहास काटे यांनी केले आनंद कर्णावट,डॉ.सुरेश अरसुडे,स्वप्नील परदेशी ,प्रवीण चोकडा,राजेंद्र घोडके,शाम भन्साळी,अॅड.अनिल लोमटे,मंजुषा जोशी, स्वरुपा कुलकर्णी,बालाजी घाडगे,रुपेश रामावत,गोपाळ पारीख, बाळासाहेब कदम,रमेश देशमुख,सचिन बेंबडे,गणेश राऊत,शेख शकील,भीमाशंकर शिंदे,सुरेश देशमुख, यांच्या सह रोटरी क्लब चे सदस्य उपस्थित होते.

## वंचित विधानसभेचा गड ताकतीने लढणार

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

विधानसभा निवडणुकीसाठी वंचित बहुजन आघाडीने शनिवारी राज्यातील १६ जणांच्या उमेदवाऱ्या जाहीर केल्या आहेत. यात आष्टीतून वेदांत सुभाष भादवे उमेदवार असणार आहेत. प्रकाश आंबेडकर यांनी या उमेदवाऱ्या जाहीर केल्या. बीड जिल्ह्यातील विधानसभा निवडणुकीच्या रणधुमाळीला सुरुवात झाली असून वंचितने राज्यभरात आपले उमेदवार जाहीर करण्यास सुरुवात केली आहे. शनिवारी १६ जणांच्या उमेदवाऱ्या जाहीर करण्यात आल्या आष्टीत आंबेडकर यांनी वेदांत सुभाष भादवेला आपल्या पक्षाची उमेदवारी जाहीर केली आहे. याशिवाय इतर १४ जणांच्या देखील उमेदवारी जाहीर करण्यात आल्या होत्या.




## बडगीरे विद्यालयात कायदेविषयक शिबिर

अंबाजोगाई । प्रतिनिधी

तालुक्यातील ममदापुर(पा.) येथील संभाजीराव बडगिरे माध्यमिक विद्यालयात तालुका विधी सेवा समिती व वकील संघ अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने उच्च न्यायालयाचे सूचनेनुसार मोबाईल व्हॅन कार्यक्रमा अंतर्गत दि.१९ आक्टोंबर शनिवार रोजी कायदेविषयक शिबीर(विधी साक्षरता शिबीर) घेण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर परेश वाघडोळे तर दिवाणी न्यायाधीश कनिष्ठस्तर सचिन मेहता दिवाणी न्यायाधीश बालवीर गोडबोले सारंग मुंडे,अंबाजोगाई वकील संघाचे अध्यक्ष अँड.जयंत भारजकर,



सचिव अँड.सचिन शेप, सहसचिव अँड.शहाजान पठाण, माजी सरकारी अँड.अशोक कुलकर्णी, मुख्याध्यापक प्रकाश मठपती हे होते.

यावेळी अँड.सारंग मुंडे म्हणाले की,मुलींनी शिक्षण घेऊन मोठे झाले पाहिजे व आपणही मुलापेक्षा कमी नाहीत हे दाखवून दिले पाहिजे नाही तर मुलींना मोलमजुरी करण्याशिवाय पर्याय राहणार नाही. तसेच अँड.कौशल्या गडदे यांनी महिला सुरक्षेसंबंधी जनजागृती या विषयावर महिला साठी असलेल्या कायद्याबाबत व महिलांनी सक्षम होण्यासाठी शिक्षण घेऊन त्यांच्या सुरक्षेसाठी असलेल्या कायद्याचा योग्य वापर करून घ्यावा असे मत व्यक्त केले.

अध्यक्षीय समारोपात परेश वाघडोळे म्हणाले की, विद्यार्थिनींनी आपल्या सोबत काही अन्याय/अत्याचार होत असेल तर कोणताही संकोच न बाळगता तात्काळ आपण आपल्या गुरुजनांना व आईवडिलांना सांगावे ज्यामुळे मोठा अनर्थ होणे टळेल. तसेच सर्वांनी शिक्षण घेऊन विविध क्षेत्रात नाव लौकिक मिळवावा असे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वकील संघाचे उपाध्यक्ष अँड.माणिक आदमाने यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सत्यनारायण सोमवंशी यांनी तर आभार प्रा. एकनाथ हरदास यांनी मानले. यावेळी ममदापूर येथील ग्रामसेवक, सरपंच, तलाठी व ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संभाजीराव बडगिरे विद्यालयाच्या शिक्षकवृंद व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

|| पान ६ वरून..

### परतूर लोणीकर यांना भाजपकडून

उमेदवारी जाहीर केल्यानंतर दिली आहे. पुढे बोलताना आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की परतूर विधानसभा मतदारसंघाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी मी अविरत संघर्ष केला आहे. केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून हजारो कोटी रुपयाचा निधी आणून परतूर विधानसभा मतदारसंघात मराठवाडा वाटर ग्रीड ही महत्त्वाकांक्षी योजना यशस्वीपणे राबविली असून परतूर शहरात उड्डाणपूल मागासवर्गीय मुलींचे वस्तीग्रह क्रीडा संकुल नाट्यगृह कोर्ट इमारत तर मंठा शहरात मागासवर्गीय मुलींचे वस्तीग्रह कोर्ट इमारत क्रीडा संकुल या सह मतदार संघातील गावागावात विजेचे आणि रस्त्याचे जाळ निर्माण केलं आहे. विधानसभा मतदारसंघातील गावागावात प्रचंड मोठ्या प्रमाणावर झालेली विकास कामे पाहता माझा परतुर विधानसभा मतदारसंघ राज्यात एक नंबर ला आहे. परतूर विधानसभा मतदारसंघात झालेली विकास काम आणि भविष्यात होणार असलेली विकास कामे याच गोष्टीचा व्हिजन घेऊन आपण सर्वसामान्य नागरिकांमध्ये जाणार असून गेल्या पंचवार्षिक निवडणुकीमध्ये मला ३०००० मताची लीड मिळाली होती. याही वर्षी मला सुमारे ४०,००० मताची लीड मिळेल असा आत्मविश्वास यावेळी आमदार लोणीकर यांनी व्यक्त केला.

### मतदारसंघाप्रमाणेच पुण्यातही

मिसाळ नावाचे शिक्षक तर जरेवाडी चे संदीप पवार हे शिक्षक गुणवत्ता वाढीचे प्रामाणिकपणे काम करत आहेत अशा शिक्षकांची आज प्रामुख्याने गरज आहे माझ्या कार्यकाळात जिल्हा परिषद शाळेच्या खुल्या असतील अंगणवाडी खुले असतील त्याला भरघोस निधी उपलब्ध करून देण्याचे काम मी प्रामाणिक केले मात्र २०१४ ते २०१९ आणि २०१९ ते २०२४ या दहा वर्षाच्या कार्यकाळात दोन लोकप्रतिनिधी यांच्या कार्यकाळात ७८४ शाळा खोल्या या कमी असून ४५० ते ५०० अंगणवाड्या खोल्या देखील उपलब्ध करून शकले नाहीत हे विदारक चित्र आज मतदारसंघाचे आहे. दहा वर्षात हे दोन्ही आजी-माजी लोकप्रतिनिधी कधी कोणाच्या सुखदुःखात दिसले नाहीत. परंतु माझे संपूर्ण कुटुंब मी माझे भाऊ देविदास आबा माझा पुतण्या श्याम माझा मुलगा जयदत्त दुसरा मुलगा सागर हे नेहमी २४ तास जनतेमध्ये राहून त्यांच्या समस्या जाणून घेण्याचे आणि त्यांच्या समस्यांचे निराकरण करण्याचे काम प्रामाणिकपणे करतो. २००४ ते २००९ या कालावधीत सेना मेहेकरीचे काम हाती घेतले २००९ ते २०१४ या कालावधीत हे काम जवळपास ९७% पूर्ण करण्याचे काम मी केले. खुंटेफळ साठवण तलाव करताना विरोधकांचे दगडं अंगावर घेतले परंतु तसूभरही मागे हटलो नाही असे सांगत गोदावरी खोरे, मांजरा खोरे, सिंदफणा खोरे यामध्ये जायकवाडी खोऱ्यातून उपलब्ध होणारे ५८ टीमसी येणारे पाणी आगामी काळात पाटोदा, शिरूर कासार तालुक्यातील सतत दुष्काळाला तोंड देणाऱ्या शेतकऱ्यांसाठी,सिंचनासाठी उपलब्ध करून देणारच आहे असा दुर्दम्य विश्वासही त्यांनी शेवटी व्यक्त केला.यावेळी नगरसेवक शांताराम भालेकर, हिंजवडीचे सरपंच दत्ता साखरे, माझी सभापती सुरेश हुळवले, मल्हारी साखरे, कासार साई चे सरपंच ललित शिंदे नगरसेवक गोपाळ माळेकर,नगरसेवक बाबा त्रिभुवन माजी सभापती प्रमिलाताई सगळे, उद्योजक बंडूशेठ तोडकर उद्योजक शहादेव चौधरी, सतीश कंठाळे, बापू तांबे,कुमार कोकणे, गणेश कदम, दीपक गुंड, राजू वलवळे, अनिल टेकाळे, सोमीनाथ मंडलिक, बापू तांबे,स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे ऊसतोड मुकादम संघटनेचे अध्यक्ष सुखदेव सानप, हडपसर नगरसेविका उज्वला जंगले,सुभाष जंगले,सोमनाथ जराड या कार्यक्रमाचे नियोजन उद्योजक अनिल टेकाळे, राजेंद्रजी वलवळे,विनोद शिंदे,दीपक गुंड,कुमार कोकने,शकर जरांगे,कृष्णा बांगर,राजू चखाले,चिंचोली सरपंच मारुती सांगळे, गणपत जगताप,हिरामण बुचुडे,युवा नेते जय साखरे,विकास एकशिंगे,गणेश कदम,सर्जेराव कचरे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

**मतदारसंघाप्रमाणेच पुण्यातही नागरिकांची गर्दी तर सर्वत्र धसांचे जंगी स्वागत**

वाकड,रूपीनगर,हडपसर आणि रांजणगाव या ठिकाणी झालेल्या कौटुंबिक स्नेह मेळाव्यात सुरेश धस यांचे जोरदार स्वागत करण्यात आले वाकड येथे हलगी पथकाचा आवाज घुमला तर हडपसर व रांजणगाव येथे मतदार संघातील उपस्थित नागरिकांनी धस यांच्यावर पुष्पवृष्टी केली.

## अंबड शहरात लाडक्या बहिणीचा अपमान

**अंबड । प्रतिनिधी**

आमदार नारायण कुचे यांनी शहरातील लाडक्या बहिणीचा अपमान केल्याचे कार्यक्रमात दिसून आले. दोन दिवसापासून अंबड शहरातील प्रत्येक घराघरात जावून महिलांना सांगितले होते कि आमदार नारायण कुचे उद्या पर्स आणि साडी वाटणार आहे

कार्यक्रमाच्या ठिकाणी साडी आणि पर्स घेण्यासाठी चार ते पाच हजार महिला कार्यक्रमासाठी दत्ताजी भाले शाळा परिसरात महिला आल्या होत्या. परंतु या कार्यक्रमात तोंड बघून ५० टक्के महिलांनाच पर्स वाटप करण्यात आल्याचे समजते परंतु ज्या महिलांना पर्स मिळाली नाही त्या महिलेने एकच गोंधळ निर्माण केला व जेवढ्या पर्स वाटप कराच्या होत्या तितक्याच महिलांना बोलायला पाहिजे होतं असे काही महिलेकडून सांगण्यात आले. खरं तर आचारसंहिता लागू झाल्यानंतर कोणत्याही वस्तू अथवा



रोख रक्कम वाटून मतदारांवर प्रभाव टाकता येत नाही. निवडणूक आयोगाच्या नियमानुसार तो आचारसंहिता भंगाचा गुन्हा असुन सत्तेच्या बळावर आपल्याला काहीही करता येईल असे गृहीत धरून लाडक्या बहिणींना बोलावले मात्र प्रशासनाला या गोष्टीची कुणकुण लागताच कार्यक्रमाचे ठिकाणी पथक पोहचले.टाकलेला डाव आपल्यावर उलटणार असे लक्षात येताच आमदार नारायण कुचे यांनी तेथून निसटले.

अतिथींच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात काही महिलांना साडी पर्स देण्यात आले होते मात्र पथक पोहचल्यावर आयोजक टीमची त्रेधातिरपीट उडाली. ऐनवेळी साड्या पर्सचे गठ्ठे लपवून ठेवावे लागले

मात्र काही लोक फार हुशार असतात.

इकडे पंचनामा सुरू असतांना काहींनी

साडी आणि पर्सचे गठ्ठे उचलून पार्सल केले.या सगळ्या गडबडीत पर्ससाठी आलेल्या महिला निराश झाल्या तेथील कार्यकर्त्यांना साडी आणि पर्स मागु लागल्या तुमच्या आचारसंहितेचे आम्हाला काय देणे घेणे नाही पहिले त्या साड्या वाटप करा असे सांगत होत्या.कारवाईला आलेले पथक सर्व काही डोळ्यासमोर घडत असतांना ते धृतराष्ट्रासारखे काही दिसत नसल्याचे वागत होते.दहा वर्षात लाडक्या बहिणींना चार दिवसाला पाणी देवू न शकणारा भाऊ पर्स आणि साड्या देवून पुन्हा पाण्यासाठी वनवन भटकायला लावणार असल्याची चर्चा पर्सविना परतलेल्या महिलातून ऐकायला मिळत होती.

## मत्स्योदरी देवी यात्रा महोत्सवाची सांगता



**अंबड । प्रतिनिधी**

श्री मत्स्योदरी देवी मंदिर अंबड नवरात्र महोत्सवामध्ये लाखो भावीक भक्ताने देवीचे दर्शन घेतले. आज नवरात्र महोत्सवाची सांगता प्राक्षाळ पुजा व अभिषेकाने झाली .

मस्योदरी देवी संस्थांनाचे अध्यक्ष तथा तहसीलदार विजय चव्हाण व त्यांच्या पत्नी सौभाग्यवती सोनाली चव्हाण यांच्या हस्ते शनिवारी (दि११) रोजी सकाळी १२.०० वाजेच्या सुमारास हा कार्यक्रम पार पाडला यावेळी अभिषेक व प्रक्ष पूजा करण्यात आली यावेळी लक्ष्मीकांत वसंतराव जोशी, यशवंत जोशी, आचार्य संतोष दुधाधारी, यांच्यासह २१ ब्राह्मण मंडलीच्या मंत्रोचा संपन्न झाली

अंबड शहरातील १८ पुरोहित उपस्थित होते व संस्थान विश्वस्त पुजारी श्री गीताविलास खुंटेफळकर, हनुमंत काळबांडे,व्यवस्थापक श्री कैलास शिंदे, संस्थान कर्मचारी, अर्जुन शिंदे तसेच रामलाल शिंदे मसाईकर तसेच पत्रकार शिवाजी मस्के, आकाश जळके, रवींद्र कारके, शेख नाझीम, गणेश जाधव,व भाविक भक्त उपस्थित होते.

cmyk

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
सोमवार दि.२१ ऑक्टोबर २०२४
४

# मध्य महाराष्ट्रातील १० जिल्ह्यात होणार गारपीट

राज्याच्या विविध भागात परतीच्या पावसानं धुमाकूळ घातला आहे. अनेक ठिकाणी या पावासमुळं जनजीवन विस्कळी तझालं आहे. तसेच शेती पिकांना मोठा फटका बसला आहे. ज्येष्ठ हवामान अभ्यासक माणिकराव खुळे यांनी दिलेल्या माहितीनुसार, २३ ऑक्टोबरपर्यंत संपूर्ण महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम पाऊस होणार आहे. माणिकारव खुळे यांनी दिलेल्या माहितीनुसार, आज शनिवार दिनांक १९ ऑक्टोबरपासून पुढील दोन दिवस म्हणजे १९ ते २० ऑक्टोबर (शनिवार-रविवार) दरम्यान खान्देश (धुळे, नंदूरबार आणि जळगाव) नाशिक नगर पुणे सातारा सांगली कोल्हापूर सोलापूर जिल्ह्यात तुरळक ठिकाणी गारपीट होण्याची शक्यताही नाकारता येत नाही. त्यामुळं शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.

राज्यात गारपीटीची शक्यता कशामुळे निर्माण झाली? रत्नागिरी जिल्ह्याच्या समोर खोल अरबी समुद्रात व थायलंडच्या पश्चिम किनारपट्टीसमोर बं. उपसागरातील दोन्हीही समुद्रातील चक्रीय वाऱ्यांच्या स्थितीतून सह्याद्रीच्या पूर्व बाजूला संपूर्ण मध्य महाराष्ट्रादरम्यान होणारा वाऱ्यांचा संयोग. )



मध्य तपांबरात म्हणजे समुद्र सपाटीपासून ५.८ किमी. उंचावर तयार झालेला ' व्हर्टिकल विंड शिअर ' (एकमेकाच्या विरुद्ध दिशेने वाहणाऱ्या असमान वेगवान वाऱ्याचा व्हर्टिकल शिअर झोन मध्य तपांबरात म्हणजे समुद्र सपाटीपासून ५.८ किमी. उंचावर, उत्तर दिशेकडून २० डिग्री अक्षवृत्त दक्षिणे पर्यंत पर्यन्त सरकलेले बळकट पश्चिमी वारे ह्या वातावरणीय घडामोडीमुळे गारपीटीची शक्यता निर्माण झाली आहे. नाशिकच्या चांदवड शहर व परिसरात परतीच्या पावसानं धुमाकूल घातलाय. चांदवडमध्ये ढगफुटी सदृश्य पावसाने जोरदार तडाखा दिला आहे. सुमारे दोन तास कोसळत असलेल्या पावसानं शहरात सर्वत्र पाणीच पाणी झालं आहे. रस्त्यावरुन गुडघ्याएवढं पाणी वाहत असल्याने अनेक दुचाकी व चारचाकी वाहने पाण्याखाली गेली आहेत. तर आठवडे बाजारातील पांचाळ वस्तीतील घरांमध्ये पाणी घुसली आहे, तसेच या भागातील काही जनावरे वाहून गेली आहेत. प्रशासनाच्या वतीने मदत कार्य सुरू असून परिस्थिती नियंत्रणात असल्याची माहिती जिल्हाधिकाऱ्यांनी दिली आहे. राहूड भागात जोरदार पाऊस झाल्याने राहुडच्या बंधाऱ्याने धोक्याची पातळी गाठल्याने नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. पावसामुळे, काढणीला आलेला मका, कांदा,सोयाबीन पिकाला मोठा फटका बसल्याने बळीराजा हतबल झाला आहे. चांदवडसह देवळा, कळवण, मनमाड, नांदगाव आदी भागातही जोरदार पाऊस सुरू आहे.

# संरक्षित ओलीतावर गहू लागवडीचे तंत्र



जमिनीतील उपलब्ध ओलाव्यावर कोरडवाहू क्षेत्रातील गव्हाची पेरणी ३१ ऑक्टोबरपर्यंत पूर्ण करावी. संरक्षित पाणी उपलब्ध असल्यास पेरणी २५ ऑक्टोबर ते ५ नोव्हेंबर दरम्यान करावी. अपेक्षित उत्पादनासाठी सुधारित जातींची निवड महत्त्वाची आहे. गहू लागवडीसाठी भारी व खोल जमिनीची निवड करावी. एक किंवा दोन पाणी उपलब्ध असल्यास लागवड जमिनीत ओलावा टिकवून धरणाऱ्या भारी जमिनीत करावी. शक्यतो हलक्या जमिनीत लागवड टाळावी. जमिनीतील उपलब्ध ओलाव्यावर कोरडवाहू क्षेत्रातील गव्हाची पेरणी ३१ ऑक्टोबरपर्यंत पूर्ण करावी. संरक्षित पाणी उपलब्ध असल्यास पेरणी २५ ऑक्टोबर ते ५ नोव्हेंबर दरम्यान करावी. खरिपात सोयाबीन किंवा गळीत धान्य लागवड असेल तर एकच कुळवणी करावी. कुळवणीच्या अगोदर चांगले कुजलेले शेणखत, कंपोस्ट खत पसरावे. लागवडीचे नियोजन : १) संरक्षित पाण्याखालील गव्हासाठी हेक्टरी ७५ ते १०० किलो बियाणे पेरणीसाठी वापरावे. २) पेरणीपूर्वी बियाण्यास थायरम (७५ टक्के डब्ल्यूएस) ३ ग्रॅम प्रती किलो बियाणे तसेच थायामेथोक्झाम १.७५ ग्रॅम प्रति किलो बियाणाला प्रक्रिया करावी. बियाणे वाळवल्यानंतर प्रति किलो बियाण्यास २५ ग्रॅम ॲझोटोबॅक्टर आणि २५ ग्रॅम स्फुरद विरघळविणाऱ्या जीवाणू संवर्धकाची बीजप्रक्रिया करावी. बीजप्रक्रियेमुळे उत्पादनात १० ते १५ टक्के वाढ होते. ३) पेरणीच्या वेळी जमिनीत पुरेशी ओल असावी. पेरणी ५ ते ६ सेंमी खोल करावी. त्यामुळे उगवण चांगली होते. संरक्षित पाण्याखालील गव्हाची पेरणी दोन ओळीत २० सेंमी अंतर ठेवून करावी. पेरणी उभी आडवी अशी दोन्ही बाजूने न करता एकेरी करावी म्हणजे आंतरमशागत करता येते. बियाणे झाकण्यासाठी कुळव उलटा करून चालवावा म्हणजे बी व्यवस्थित दबून झाकले जाते. जमिनीचा उतार लक्षात घेऊन गव्हासाठी २.५ ते ४ मीटर रुंद व ७ ते २५ मीटर लांब आकाराचे सारे पाडावेत.

रासायनिक खत व्यवस्थापन -

पेरणीची वेळ-(किलो/हेक्टर)- स्फुरद(किलो/हेक्टर)-पालाश(किलो/हेक्टर) जिरायती पेरणी-४० -२०-०० मर्यादित सिंचन पेरणी-८०-४०-४० टीप : जिरायती पेरणी करताना नत्र आणि स्फुरद पेरणीच्या वेळेस द्यावे. पाणी व्यवस्थापन : १. एकच पाणी देणे शक्य असल्यास पेरणीनंतर ४० ते ४२ दिवसांनी द्यावे. २. दोन पाणी देणे शक्य असल्यास पहिले पाणी पेरणीनंतर २० ते २२ दिवसांनी आणि दुसरे पाणी ६० ते ६५ दिवसांनी द्यावे. ३.तीन पाणी देणे शक्य असल्यास पहिले पाणी पेरणीनंतर २० ते २२ दिवसांनी आणि दुसरे पाणी ४० ते ४२ दिवसांनी व तिसरे पाणी ६० ते ६५ दिवसांनी द्यावे. ४. गव्हास एकच पाणी दिले तर पुरेशा पाण्यापासून आलेल्या उत्पादनाच्या तुलनेत ४१ टक्के घट येते आणि दोन पाणी दिले तर उत्पादनात २० टक्के घट येते.

कोरडवाहू आणि मर्यादित सिंचनासाठी सुधारित जाती : आंतरमशागतीचे नियोजन : १) पेरणीपासून ३० ते ४० दिवसांच्या आत तणांचे प्रमाण लक्षात घेऊन एक किंवा दोन वेळा खुरपणी करावी. जरुरी प्रमाणे १ ते २ वेळा कोळपणी करून जमीन मोकळी करावी. त्यामुळे तणांचे नियंत्रण होते. जमिनीत ओलावा टिकून राहण्यास मदत होते. २) पहिली कोळपणी पीक तीन आठवड्यांचे झाल्यावर करावी. कोळपे चालविल्याने जमीन भुसभुशीत होऊन मातीचा थर चांगला बसू शकतो. जमिनीतील ओलावा अधिक काळ टिकून राहतो. आच्छादनासाठी तूरकाठ्यांचा भुसा, धसकटे, वाळलेले गवत, भाताचे काड वापरावे. पीक ४ ते ५ आठवड्यांचे होण्याच्या आत आच्छादनाचा वापर करावा. आच्छादनाचा वापर केल्यामुळेपिकामध्ये २५ ते ३० मिलिमीटर ओलाव्याची बचत होते. पिकास महत्त्वाच्या पाणी देण्याच्या अवस्थेत ओलावा अधिक मिळतो. तसेच जमीन भेगाळण्याची तीव्रता कमी होते. ठिबक/तुषार सिंचन पध्दतीचा अवलंब करावा. पाण्याची उपलब्धता असल्यास संरक्षित किंवा पीक जगविण्यासाठी पाणी द्यावे. तुषार पद्धतीने पाणी दिल्यास जास्तीचे क्षेत्र कमी कालावधीत भिजविता येईल.

# कृत्रिम रेतनाद्वारे शेळ्यांची गर्भधारणा

ग्रामीण भागात शेळीपालन हा एक महत्वाचा शेतीपूरक व्यवसाय आहे. ग्रामीण भागातील अर्थशास्त्र सुद्धा बऱ्यापैकी या व्यवसायावर अवलंबून आहे. हा व्यवसाय जास्तीत जास्त फायदेशीर कसा करता येईल यासाठी प्रयत्न सुरु असतात. असाच एक शोध म्हणजे कृत्रिम रेतन. कृत्रिम रेतन एक असे तंत्र आहे ज्याद्वारे पशुपालक त्यांच्या गायी आणि म्हशींचा विकास दर, आरोग्य आणि उत्पादकता वाढवून त्यांचे उत्पन्न वाढवू शकतात. परंतु आता शेळ्यांमध्ये सुद्धा कृत्रिम गर्भधारणा करण्याचे प्रयोग केले जात आहे. काही ठिकाणी हे प्रयोग यशस्वी सुद्धा झाले आहेत. कृत्रिम रेतनाद्वारे शेळयांच्या जाती सुधारण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत.

कृत्रिम रेतन म्हणजे काय?

कृत्रिम रेतन तंत्रज्ञान हे सहाय्यक पुनरुत्पादन तंत्रज्ञान आहे, ज्याचा उपयोग साठलेले वीर्य थेट प्राण्यांच्या गर्भाशयात जमा करण्यासाठी केला जातो. पशुधनाची कार्यक्षमता आणि अनुवांशिक गुणवत्ता सुधारण्यासाठी ही एक उत्तम प्रजनन पद्धत आहे. याचा फायदा शेळीपालक यांना मोठ्या प्रमाणात होणार आहे. मथुरा येथे स्थित पंडित दीनदयाळ उपाध्याय कन्सेप्शन वेटरनरी सायन्सेस युनिव्हर्सिटी येथे गेल्या अनेक वर्षांपासून कृत्रिम रेतनचा अभ्यास सुरू आहे, ज्याद्वारे शेळ्यांच्या कळपाचे बीजारोपण करून करडांना जन्म देता येईल. त्याच वेळी. अशा परिस्थितीत सर्व शेळ्यांची एकत्र गर्भधारणा केल्यास त्यांची चांगली काळजी घेतली जाईल. शेळीच्या करड्यांचे मृत्युदर सुद्धा कमी होईल. जे शेळीपालनासाठी खूप उपयुक्त आहे.

शेळ्यांच्या कृत्रिम रेतनाचा काय फायदा होईल? : एक शेळी सुमारे १४ महिन्यांत ३५ ते ४० किलो वजनाची होते हे. पर्यावरण आणि योग्य आहाराअभावी त्यांचा वाढीचा दर कमी झाला आहे. त्यामुळे आता हा कालावधी वाढून १६ महिन्यांचा झालेला असल्याने पशुपालकांचे मोठे नुकसान होत आहे. अशा परिस्थितीत पशुपालकांनी वैज्ञानिकांच्या या एआय तंत्रज्ञानाचा अवलंब केल्यास शेळयांच्या मुलांच्या शारीरिक विकासात वाढ होऊन उत्पादनही चांगले होईल.

# रांगडा कांद्याची लागवड

महाराष्ट्रात अनेक भागात रांगडा कांद्याची लागवड होते कारण या हंगामात लागवड केलेल्या कांद्याची साठवणक्षमता खरिप हंगामापेक्षा उत्कृष्ट असते. रांगड्या कांद्याच्या लागवडीसाठी ऑगस्ट, सप्टेंबर मध्ये रोपवाटिका तयार केली जाते आणि ऑक्टोबर किंवा नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात रोपांची पुनर्लागवड केली जाते. जाणून घेऊ या रांगडा कांद्याचे सध्या करावयाचे व्यवस्थापन.

रांगडा कांद्याचे व्यवस्थापन : एक एकर कांदा लागवडीसाठी दोन गुंठे क्षेत्रावर रोपवाटिका तयार करावी. एक एकर लागवडीसाठी दोन ते तीन किलो बियाणे पुरेसे आहे. पेरणीपूर्वी बीज प्रक्रिया करण्यासाठी प्रति किलो बियाण्यास २ ग्रॅम कार्बेन्डाझिम हे बुरशीनाशक चोळावे. पेरणीपूर्वी २०० किलो शेणखतासोबत ५०० ग्रॅम ट्रायकोडर्मा व्हिरीडी वापरून जमिनीत मिसळावे. रोपवाटिकेत ठिबक किंवा स्प्रिंकलर सिंचन पद्धतीचा वापर करण्यासाठी जमिनीपासून १० ते १५ सें.मी. उंच, १ ते १.२ मीटर रूंद आणि गरजेनुसार



लांब गादीवाफे जमिनीच्या उताराला आडवे तयार करावेत. यामुळे रोपांची वाढ एकसारखी होते आणि पाणी फार काळ साचून राहत नाही, रोपे कुजत किंवा सडत नाहीत, लावणीच्या वेळी सहज उपटून काढता येतात, रोपांच्या गाठी जाड व लवकर तयार होतात. वाफे तयार करताना दर १६०० ग्रॅम नत्र, ४०० ग्रॅम स्फुरद, ४०० ग्रॅम पोटॅश प्रति २०० चौरस मीटर याप्रमाणे खते द्यावीत.

रुंदीशी समांतर ५-७.५ सें.मी. अंतरावर एक रेघा पाडून १-१.५ से.मी. खोलीवर बियाणे पेरावे. पेरणीनंतर चांगले कुजलेले शेणखत किंवा कंपोस्ट खताने बियाणे झाकून ठेवावे, नंतर झारीने जेमतेम वाफ्यावर फिरेल अशा पद्धतीने पाणी द्यावे. पेरणीनंतर २० दिवसांनी हाताने खुरपणी करून ८०० ग्रॅम प्रति २०० चौरस मीटर या प्रमाणात नत्र द्यावे.




## महत्वाच्या घटना

१२९६ : अल्लाउद्दिन खिलजी हे दिल्ली येथील शासक बनले.
१८५४ : फ्लोरेन्स नायटिंगेल आणि इतर ३८ नर्सेसना क्रिमीयन युद्धात वैद्यकीय सेवेसाठी पाठवण्यात आले.
१८७९ : थॉमस एडीस यांनी दिव्यांच्या प्रकाशाच्या डिझाइनसाठी पेटंट दाखल केले.
१८८८ : स्वीस सोशल डेमोक्रेटिक पार्टी सुरु झाली.
१९३४ : जयप्रकाश नारायण यांनी 'काँग्रेस सोशालिस्ट पार्टी'ची स्थापना केली.
१९४३ : सिंगापूर येथे आझाद हिन्द सेनेची स्थापना
१९४५ : फ्रान्समधे स्त्रियांना मतदानाचा अधिकार मिळाला.
१९५१ : डॉ. शामाप्रसाद मुकर्जी यांनी दिल्ली येथे 'भारतीय जनसंघ' या पक्षाची स्थापना केली.
१९८३ : प्रकाशाने निर्वातात १/२९९७९२४५८ सेकंदात कापलेले अंतर अशी १ मीटरची व्याख्या ठरवली गेली.
१९८७ : भारतीय शांतिसेनेने जाफनातील एका रुग्णालयावर केलेल्या हल्ल्यात ७० तामिळ ठार झाले. यात रुग्ण, डॉक्टर व नर्सेसचा समावेश होता.
१९८९ : जनरल अरुणकुमार वैद्य यांचे मारेकरी सुखदेवसिंग आणि हरविंदरसिंग यांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली.
१९९२ : अकराव्या ताश्कंद आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात अभिनेत्री अपर्णा सेन यांना 'महापृथ्वी' या बंगाली चित्रपटातील भूमिकेबद्दल सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार मिळाला.
१९९९ : चित्रपट निर्माते बी. आर. चोप्रा यांना 'दादासाहेब फाळके पुरस्कार' जाहीर
२००२ : मुंबई पोलिसांनी सलमान खान विरुद्ध वांद्रे दंडाधिकारी कोर्टात आरोपपत्र दाखल केले.
२०१८ : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशांतील आपत्ती प्रतिसाद कार्यात सहभागी पोलिस आणि निमलष्करी दलाच्या जवानांचा सन्मान करण्यासाठी नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या नावाने पुरस्कार जाहीर केला.

## जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८३० : हिमालय भागाचा शोध लावणारे पहिले भारतीय व्यक्ती नैन सिंह रावत यांचा जन्मदिन.
१८३३ : अल्फ्रेड नोबेल स्वीडीश संशोधक आणि नोबेल पुरस्कारांचे प्रणेते (मृत्यू: १० डिसेंबर १८९६)
१८८७ : भारतीय वकील आणि राजकारणी कृष्णा सिंह यांचा जन्म. (मृत्यू: ३१ जानेवारी १९६१)
१९१७ : राम फाटक गायक व संगीतकार (मृत्यू: २६ सप्टेंबर २००२)
१९२० : धर्मभास्कर गं. ना. कोपरकर वैदिक धर्म, संस्कृती, तत्त्वज्ञान यांचा विज्ञानाधारित अभ्यास करुन त्या संदर्भाचे लेखन, प्रकाशन, प्रचार व संशोधन त्यांनी केले. चार वेद, सहा शास्त्रे, मनुस्मृती, याज्ञवल्कस्मृती व इतर अनेक असे धर्म या विषयावर १९७ ग्रंथ त्यांनी लिहीले. त्यांना द्वारकापीठाच्या शंकराचार्यांकडून 'धर्मभास्कर' तर करवीरपीठाच्या शंकराचार्यांकडून 'धर्मऋषी' या पदव्या मिळाल्या होत्या.
१९३१ : शम्मी कपूर हिन्दी चित्रपट अभिनेता व निर्माता (मृत्यू: १४ ऑगस्ट २०११)
१९३८ : प्रख्यात भारतीय हिंदी चित्रपट अभिनेत्री आणि नर्तक हेलन यांचा जन्मदिन.
१९४० : एडसन अरांतेस डो नासिमेंटो उर्फ पेले ब्राझीलचा फुटबॉलपटू
१९४९ : बेंजामिन नेत्यान्याहू इस्त्रायलचे वे९ पंतप्रधान

## मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१४२२ : चार्ल्स (सहावा) फ्रान्सचा राजा (जन्म: १६ सप्टेंबर १३८०)
१८३५ : मुथुस्वामी दीक्षीतार तामिळ कवी व संगीतकार (जन्म: २४ मार्च १७७५)
१९८१ : दत्तात्रय रामचंद्र बेन्द्रे ज्ञानपीठ पारितोषिक विजेते कन्नड कवी (जन्म: ३१ जानेवारी १८९६ धारवाड, कर्नाटक)
१९९० : भारतीय तत्त्ववेत्ता आणि लेखक प्रभात रंजन सरकार यांचे निधन. (जन्म: २१ मे १९२१)
१९९५ : लिंडा गुडमन अमेरिकन ज्योतिषी व लेखिका (जन्म: ९ एप्रिल १९२५)
२०१० : भारतीय कवी आणि अनुवादक अ. अय्यप्पन यांचे निधन. (जन्म: २७ ऑक्टोबर १९४९)
२०१२ : यश चोप्रा चित्रपट दिग्दर्शक, पटकथालेखक आणि निर्माते (जन्म: २७ सप्टेंबर १९३२)

# रब्बी हंगामात लसूण पिकाची लागवड

रब्बी ज्वारी, हरबरा, जवस, करडई, गहू इत्यादी पिकांसह या हंगातामात नोव्हेंबर महिण्यापर्यंत राज्यातील शेतकरी कमी अधिक प्रमाणात लसूण पिकाची लागवड करतात. यापिकातुन चार महिण्यात चांगले उत्पादन व पैसाही मिळतो. काढणीनंतर वर्षभर या पिकाची चांगला भाव मिळेपर्यंत साठवणही करता येते. म्हणून दररोज प्रत्येक घरातील स्वयंपाकाची चव वाढवणाऱ्या शिवाय औषधी गुणधर्म असणाऱ्या या पिकाची लागवड ते काढणी ची संपूर्ण माहीती घेतल्यास चांगला फायदा होऊ शकतो.

जमिनीची निवड व हवामामन : लसूणाचे कंद जमिनीत वाढत असल्याने पाण्याचा उत्तम निचरा होणारी भुसभुशीत कसदार जमीन या पिकासाठी निवडावी. लसूण लागवड करण्यासाठी थंड हवामान लागते. ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यात लागवड करावी. लसूण पक्क होत असताना व काढणीच्या काळात कोरडे हवामान आवश्यक आहे. पिकाच्या जातीमध्ये फुले नीलिमा, फुले बसवंत, गोदावरी, श्वेता, यमुना सफेद, फाउंलाईट इत्यादिंचा समावेश होतो.

लागवडीची पद्धत : लसूणाची लागवड सपाट वाफ्यात करावी कारण लसुन जमिनीत खोल वाढतो. जमिनीत कुजलेले शेणखत २५ ते ३० टन मिक्स करून घ्या व जमिनीच्या उतारानुसार वाफे बांधावी४२/३२ मीटर अंतरावर सपाट वाफे करावीत. जमिनीला जास्त उतार असेल तर १.५ २ मीटर रुंद१०१२ सेमी लांबीचे वाफे करून लागवड करावी. सपाट वाफे ची रुंदी१५ सेमी अंतरावर खुरप्याच्या साह्याने रेघा पाडून त्यांत १० सेमी अंतरावर उभ्या पाकळ्या रोवून मातीने झाकाव्यात .लागवडीच्या वेळी बियाणे दहा लिटर पाण्यात २० मिली कार्बोसल्फान व १५ गरम कार्बनडाझिम च्या द्रावणात दोन तास बुडवून लागवड करावी.

खत व्यवस्थापन : लागवडीच्या वेळी कुजलेले शेणखत २५ ते ३० टन जमिनीत मिसळाव .१०० किलो नत्र, ५० किलो स्फुरद, ५० किलो पालाश प्रति हेक्टरी द्यावीत. नंतर उरलेली दुसरी नत्राची मात्रा दोन वेळा विभागून द्या. पहिली मात्रा लागवडीनंतर ३० दिवसांनी, दुसरी मात्रा लागवडीनंतर ४५ ते ५० दिवसांनी तसेच लागवडीच्या वेळी अमोनियम सल्फेट व सिंगल सुपर फॉस्फेट या खताचा उपयोग केल्यास गंधकाची मात्रा तयार होते.

पाणी व्यवस्थापन : लसणाची लागवड केल्यानंतर लगेच पाणी द्यावे. आंबवणी चार ते पाच दिवसांनी द्यावी. लसणाची मुळे १५ ते २० या थरात असतात त्यामुळे वरच्या थरात ओलावा असणे आवश्यक आहे .या पिकास आवश्यकतेनुसारपाणी द्यावे. पाण्याचा ताण पडणार नाही याची काळजी घ्यावी.

रोगनियंत्रण : फुल किडी - ही नुकसानकारक किड आहे. सकाळी किंवा रात्रीच्या वेळी आक्रमण करते .ही पानावरील रस शोषून करते त्यामुळे पात पांढरी पडून वाकडी होते. पात वाकडी झाल्यास लसनाचे पोषण होत नाही. उपाय ,दहा लिटर पाण्यात स्टिकर घेऊन + कार्बोसल्फान २० मिली+ सापर मिश्रीन १० मिली घेऊन फवारणी करावी. करपा - करपा हा बुरशीजन्य रोग आहे. या रोगामुळे पाण पिवळी पडतात आणि पानावर चट्टे वाढतात. पाणे सुकतात .उपाय २५ ते ३० मिलि डायथेन ४५ आणि कार्बनडाझिम २० मिली गरम स्टिकर १५ मिली घेऊन फवारणी करावी. कंदकूज उपाय - ही बुरशी लसनामध्ये वाढते ही बुरशी आत शिरल्याने पाकळ्या मऊ होतात व काळया रंगाचा थर जमा होतो. उपाय निरोगी बियाणे वापरावे लागवडीच्या वेळी वापरत भरपूर पाणी द्यावे.

लसणाची काढणी : लसणाचे पीक १२० ते १३० दिवसांत काढणीस तयार होते. लसणाची वाढ झाली की पानांची वाढ थांबते .पाने पिवळी पडतात. पाने वाळण्यापूर्वी काढणी करावी. जेणेकरून पेढी बांधणे सोपे जाईल. लसूण खुरप्याने किंवा कुदळीच्या सहाय्याने काढणी करावी. लसुन दोन दिवस शेतात तसाच ठेवावा. पातीने योग्य झाकावा. त्यानंतर जुड्या बांधणी करावी व झाडा खाली किंवा घरात वर बांधाणी करावी. हेक्टरी उत्पन्न १० ते १५ टन मिळते.



# बुद्धांचा धम्म आचरणात आणला तर मानवाचे कल्याण: अतुरलिय महाथेरो

## भिक्खू धम्मशील थेरो यांचा वर्षावास अधिष्ठान समारोप व चिवरदान कार्यक्रम

माजलगाव । प्रतिनिधी

बुद्धांच्या मूर्तीसमोर केवळ वंदन करून चालणार नाही तर स्वतःला जाणून घ्यावे व धम्माचे आचरण करावे, तरच अखंड मानवजातीचे कल्याण होईल, असा उपदेश श्रीलंका येथील माजी खासदार तथा पुज्य. भिक्खू अतुरलिय रतन महाथेरो यांनी दिला. ते श्रावस्ती बौद्ध विहार केसापुरी कॅम्प येथे दि. १९ ऑक्टोबर रोजी कठीण चिवरदान व वर्षावास समारोप कार्यक्रमात बोलताना दिला. सद्धम्म सेवा संघ माजलगावआयोजीत पुज्य भंते धम्मशिल थेरो यांचा १२ वा वर्षावास अधिष्ठान व चिवरदान कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी पंचरंगी धम्मध्वजाचे ध्वजारोहन भंते पंय्यातिस्स थेरो हस्ते करण्यात आले. तर बोधीवृक्ष वंदना भंते धम्मशिल थेरो यांनी घेतली.

धम्मदेसना कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी डॉ.भदंत उपगुप्त महाथेरो हे होते. तर विशेष अतिथी म्हणून पुज्य भिक्खु अतुरलिय रतन महाथेरो हे होते. डॉ.इंदवस्स महाथेरो,भंते पय्यानंद थेरो, भिखू नागसेन,भिक्खू एस नागसेन,भिक्खू धम्मसार, धम्मपिठावर होते. यावेळी पुढे बोलताना भंते अतुरलिय रत्न महाथेरो म्हणाले की, मानव कल्याणासाठी राग द्वेष मत्सर बंद करायचा असेल तर बुद्धांची करुणा आचरणात आणावी प्रत्येकाच्या मनात प्रेम, करुणा जागरूक असावी. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे जागतिक कीर्तीचे विद्वान होते, त्यांनी सांगितलेल्या गोष्टी आपण जीवनात आचरणात आणाव्यात. बुद्धांच्या धम्माला गौरवशाली इतिहास आहे. नालंदा तक्षशिला विक्रमशिला हे बौद्ध





विद्यापीठ होते तेथे शिकविले जाणारे संगीत, आयुर्वेद यांचे मूळ बौद्ध धर्मात आहे, असेही ते म्हणाले.कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. भदंत उपगुप्त भंते यांनी बौद्ध धम्माचे तत्वज्ञान सांगून सद्यस्थितीत मानवी जीवनावर उपदेश दिला. तसेच अजिंठा येथे १५ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या जागतिक बौद्ध धम्म परिषदेस उपस्थित राहण्याचे आवाहन केले.तसेच बहुजन नेते बाबुराव पोटभरे यांनी माजलगाव शहरातील व परिसरातील धम्म चळवळ सोळा वर्षाने परत पुनर्जीवित झाली असल्याचे समाधान व्यक्त करून, आपल्या तरुणपणापासून त्यांनी धम्म चळवळीला वाहून घेत करोडो रुपयांचे दान-पुण्य केले असल्याचे सांगितले भदंत उपगुप्त महाथेरो यांच्यामुळे बौद्धधम्म चळवळीस गती आले असल्याचेही त्यांनी सांगितले. यावेळी त्यांनी तीन लाख रुपये रोख शिवणी येथील बौद्ध विहारासाठी अध्यक्ष भदंत उपगुप्त महाथेरो व सचिव भिक्खू धम्मशील थेरो यांच्याकडे सहकुटुंब सुपूर्द केली. याप्रसंगी पुज्य भिखु अतुरलिय रतन महाथेरो,डॉ. इंदवस्स महाथेरो,भंते पंय्यानंद थेरो,भंते धम्मशिल, भदंत महविरो,भंते नागसेन,भिक्खू एस.नागसेन,भिक्खू धम्मसार भिक्खु आरोग्यन यांनी आपल्या मधुरवाणीत धम्मदेसना दिली. सूत्रसंचालन ॲड.दशरथ मकसरे यांनी केले. प्रास्ताविक पांडुरंग जाधव यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सद्? धम्म सेवासंघाचे अध्यक्ष सदाशिव भालेराव,ऍड.दशरथ मकसरे,सचिव जि. एन.घनघाव, पांडुरंग जाधव, बि.एच.सातपुते,रविकांत उघडे, धम्मपाल जावळे,शिनगारे सर,सोपान उजगरे,विजय होळीकट्टी, लीलाताई उजगरे, वाल्हाबाई टाकणखार, हरीबाई टाकणखार टी.के. तरकसे, धम्मचारी अमोलरत्न, अरुण नाकलगावकर यांनी परिश्रम घेतले. भोजनदान व शिवणी बौध्द विहारास ३ लाख रुपये धम्मदान बहुजन विकास मोर्चाचे संस्थापक अध्यक्ष बाबूराव पोटभरे यांनी दिले. तसेच उपस्थित भंतेस चिवरदान लक्ष्मण पोटभरे, डॉ एन बी शिनगारे व कपिल डोंगरे यांनी केले. तर मंडप व्यवस्था कृउबा समितीचे उपसभापती श्रीहरी मोरे, पाणी व्यवस्था निशांत साळवे, प्रवास व्यवस्था डॉ.विलासराव डोंगरे व आशाताई तानाजी सिरसट यांनी केले. यावेळी मोठ्या संख्येने उपासक उपसिका उपस्थित होते.

### संगीत व आयुर्वेदाचे मूळ बौद्ध धर्मात आहे

बौद्ध धम्माचे मूळ विचार श्रीलंकेतील भिख्खू यांनी मोठ्या कष्टाने जतन करून ठेवले आहेत. त्रिपिटक या ग्रंथात अनेक महत्वपूर्ण विषयांवर विवेचन, विविध विद्यांची माहिती आहे. यामध्ये संगीत, आयुर्वेद यांचे मूळ आहे. प्राचीन काळात नालंदा, तक्षशिला, विक्रमशिला या भारतातील नामांकित विद्यापीठामध्ये संगीत,आयुर्वेद,मार्शल आर्ट (कराटे) यांचा अभ्यास केला जात असे. तसेच बौध्द धर्मात मन एकाग्र करण्यासाठी विपश्यना विद्येचा महत्व आहे.

# माकप निवडणूक रिंगणात उभा-घाडगे

## माजलगाव, परळी मतदार संघात तयारी

परळी । प्रतिनिधी

विद्यार्थी, युवक, शेतकरी व कष्टकरी कामगारांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी माकप परळी वै व माजलगाव विधानसभा मतदारसंघातुन निवडणुक लढविणार आहे. सत्ताधारी व विरोधक जनतेच्या प्रश्नां ऐवजी भावनिक प्रश्न पुढे करीत आहे. त्यामुळे बीड जिल्ह्यातील दोन्ही मतदारसंघांत माकप निवडणुक लढविणार असल्याची माहिती मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे राज्य कमिटी सदस्य कॉ पी एस घाडगे यांनी दिली आहे.



केंद्रात व राज्यात सत्तेत असलेल्या सरकारने शेतकरी, शेतमजुरांच्या प्रश्नाची सोडवणुक करण्या ऐवजी प्रश्न वाढले आहेत. युवकांच्या हाताला काम नाही. मतदारांमध्ये विद्यमान सरकार विषयी चिड निर्माण झालेली आहे. राज्यात धर्म व जातीयवादावर निवडणुक लढविली जात आहे. जनतेच्या प्रश्नांना जाणीवपूर्वक दुर्लक्षीत केले जात आहे. त्यामुळे बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथ व माजलगाव विधानसभा मतदारसंघातुन मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष निवडणुक लढविणार आहे. भाजपच्या सरकार चा पराभव करण्यासाठी महाविकास आघाडी सोबत माकप सामंजस्याची भुमिका घेत आहे. माकप बीड जिल्हा समिती ने राज्य समिती कडे दोन्ही मतदारसंघांत निवडणूक लढविण्याची तयारी दर्शवली आहे. माकप राज्य समिती ने महाविकास आघाडी कडे दोन्ही मतदारसंघ मिळावे अशी आग्रही मागणी केली आहे. बीड जिल्ह्यात माकपने शेतकरी, कष्टकरी, असंघटित क्षेत्रातील कामगार व विद्यार्थी-युवकांच्या प्रश्नावर सातत्याने आंदोलने केली आहेत. तसेच शोषित, वंचित व महिलांच्या प्रश्नावर सातत्याने आंदोलने केली आहेत. दोन्ही मतदारसंघांत माकप ची संघटनात्मक बांधणी आहे. समाजातल्या वेगवेगळ्या स्तरांमध्ये पक्षाला मानणारे व चळवळीत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची फळी आहे. २०१८ पासुन केलेल्या आंदोलनामुळे कोट्यवधी रुपयांचा पिक विमा लाखो शेतकऱ्यांना मिळाला आहे. त्यासह असंघटीत क्षेत्रातील कामगांराना न्याय मिळवून देण्यात आला आहे. त्यामुळे परळी वैजनाथ व माजलगाव मतदारसंघ महाविकास आघाडी ने माकप साठी सोडावा अशी मागणी करण्यात आलेली आहे. दोन्ही मतदारसंघांत माकप ताकतीने निवडणुका लढविणार असल्याचे माकपचे राज्य समिती सदस्य कॉ पी एस घाडगे यांनी व्यक्त केला आहे.

# सौताडा येथील मुख्यमंत्री युवा कार्यक्रम ट्रेनिंग शिक्षक निवड रद्द

## महिला उमेदवार निवडीसाठी विचार करण्याचे आदेश

पाटोदा । प्रतिनिधी


सौताडा ता. पाटोदा जि. बीड येथील प्राथमिक शाळेमध्ये मुख्यमंत्री युवा कार्यक्रम ट्रेनी शिक्षक निवड प्रक्रिया राबविण्यात आली होती या प्रक्रियेमध्ये शासन निर्णयातील युवा या शब्दामुळे व वरिष्ठांच्या फोन संदेशद्वारे युवा याचा अर्थ पुरुष होतो असा अर्थ लावून सदरील प्रक्रियेमध्ये अर्ज केलेल्या ऐश्वर्या मकरध्वज शिंदे यांची निवड रद्द करून सदरील प्रक्रियेमध्ये पुरुष उमेदवार गणेश शेषराव सानप यांची निवड करण्यात आली होती सदरील महिला उमेदवार ऐश्वर्या मकरध्वज शिंदे यांनी वरील भेदभावविरुद्ध मा. उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ मध्ये ॲड. नरसिंह जाधव यांच्या मार्फत रिट याचिका क्रमांक १०३१४/२०२४ दाखल केली होती व सदरील याचिकेमध्ये भारतीय राज्यघटनेने दिलेल्या समानतेच्या तत्वाला बाधा येऊन पुरुष व महिला असा भेदभाव करून समान संधीच्या अधिकाराची अवहेलना केली आहे व महिला म्हणून निवड प्रक्रियेमधून बाद करणे हे घटनाबाह्य असल्याचे नमूद करून वरील निवड रद्द करून ऐश्वर्या शिंदे यांना वरील निवड प्रक्रियेमध्ये सामील करून घ्यावे अशी विनंती करणाऱ्या याचिका केची सुनावणी दिनांक ०७/१०/२०२४ रोजी झाली असता मा. उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती श्रीमती विभा कंकणवाडी व ए.जी. चपळगावकर यांच्या पुढे झाली असता न्यायालयाने जिल्हा परिषद चे वकील यांना वरील भेदभाव संदर्भामध्ये विचारणा केली असता जिल्हा परिषदेचे वकील ॲड. प्रशांत डी. सूर्यवंशी यांनी असली प्रक्रिया रद्द केल्याची व गणेश शेषराव सानप यांची निवड रद्द केल्याचे व न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले त्यानंतर मा. उच्च न्यायालयाने वरील दोन्ही बाजूचा युक्तिवाद ऐकून ऐश्वर्या शिंदे यांची याचिका मंजूर करून सदरील महिलेला सदरील निवडक प्रक्रियेमध्ये विचारात घेऊन निर्णय घ्यावा असे आदेश दिले. याचिकाकर्त्याच्या वतीने ॲड. नरसिंह जाधव यांनी काम पहिले त्यांना ॲड. राकेश ब्राह्मणकर ॲड रवींद्र वानखेडे ॲड. सोनाली गणेश सोमवंशी व ॲड. गौरव एस. खांडे यांनी सहकार्य केले. तसेच शासनाच्या वतीने ॲड. आर.पी. गौर तर जिल्हा परिषदच्या वतीने ॲड. पि.डी. सूर्यवंशी यांनी काम पहिले.



# कडूबाई राजाराम भवर यांचे निधन

चौसाळा । प्रतिनिधी

येथील नागरिक तथा गजानन नागरी सहकारी बँकेचे व्यवस्थापक जयसिंग भवर यांच्या मातु श्री कडूबाई राजाराम भवर यांचे नुकतेच दि २०/१०/२०२४ रोजी दुःख निधन झाले मृत्यू समई त्यांचे वय ८० वर्षाचे होते कै कडू बाई भवर यांचा मनमिळाऊ स्वभाव असल्याने त्या सर्व परिचित होत्या त्यांच्या मागे जय सिंग भवर व भारत भवर हे दोन मुले सुना नातवंडे आदी परिवार आहे त्यांच्या अंत्यविधीला गावातील सर्वाथरातील नागरिक उपस्थित होते त्यांच्या मृत्यू बद्दल गावात हळहळ व्यक्त केली जाते



# बायकोकडून नवऱ्याला जाळून मारण्याचा प्रयत्न

## अंगावर टाकले पेट्रोल,पळून गेल्याने वाचला जीव

केज । प्रतिनिधी

नवऱ्या पासून विभक्त राहत असलेल्या पत्नीने तिच्या प्रॉपर्टीच्या वादातून स्वतःच्या नवऱ्याच्या अंगावर पेट्रोल टाकून जाळून मारण्याचा प्रयत्न केल्याची खबळजनक घटना घडली आहे. या बाबतची माहिती अशी की, केज येथील पान मटेरीयलचा व्यवसाय करणाऱ्या एका व्यक्तीची पत्नी ही एक वर्षापासुन त्याच्या पासून विभक्त राहत आहे. या दोघांमध्ये प्रॉपर्टीचा वाद सुरु असून तिचे अन्य एका व्यक्तीसोबत अनैतिक प्रेम सबंध आहेत.

शिवीगाळ, चाकुहल्ला करुन केले जखमी १५ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ७:०० वा. च्या सुमारास तिचा नवरा हा त्याच्या पान मटेरियलच्या दुकानावर असताना त्याची पत्नी आणि मुलगी यांच्या सोबत विशाल दत्तात्रय मस्के आणि बाबा पठाण हे दुकानावर आले. त्याची पत्नी त्याला शिवीगाळ करु लागली. तेव्हा तो दुकानाचे बाहेर आला असता, विशाल दत्तात्रय मस्के, बाबा पठाण व त्याची मुलगी यांनी त्याला पकडले आणि पत्नीने तिच्या बॅगे मध्ये आणलेली पेट्रोलची बाटली त्याच्या अंगावर ओतली.

काडी ओढुन नवऱ्याच्या अंगावर टाकत असतांना तो झटापट करुन तेथुन पळून गेला. त्यानंतर तो पोलीस ठाण्याकडे पळून जात असताना रस्त्यात एका सलुनचे दुकाना समोर उभे असलेल्या निखील समुद्रे, सुरज नाईकवाडे, करण हजारे यांनी त्याला अडवुन शिवीगाळ केली. तसेच त्याला लाथा-बुक्याने मारहाण केली. निखील समुद्रे याने चाकुने त्याच्या डाव्या हाताच्या वार केला. त्याच्या आराडाओरड्याने आजुबाजुच्या दुकानातील लोक बाहेर आले.

तेव्हा समुद्रे याने तुला जिवंत ठेवणार नाही अशी धमकी देऊन तेथुन निघुन सात जणांवर गुन्हा दाखल यासंदर्भात गुरुवारी (दि. १७) त्याने केज पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारी वरून त्याच्या बायकोसह विशाल दत्तात्रय मस्के, बाबा पठाण, निखील समुद्रे, सिध्दी नितीन काळे, सुरज नाईकवाडे आणि करण हजारे सर्व रा. केज या सात जणांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी पोलीस उपनिरीक्षक राजेश पाटील हे तपास करीत आहेत.

# विधानसभा मतदार संघातील मतदान यंत्रांचे पहिले सरमिसळ पूर्ण

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील सहाही विधानसभा सार्वत्रिक निवडणूक मतदार संघातील मतदान यंत्रांचे प्रथम स्तरीय संगणकीकृत सरमिसळ (१ ) आज झाले. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात प्रथमस्तरीय संगणकीकृत सरमिसळ प्रक्रियेच्या वेळी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अविनाश पाठक, उपजिल्हानिवडणूक अधिकारी महेंद्र कुमार कांबळे, तहसीलदार अविनाश शिंगटे यांच्यासह विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी उपस्थित होते.

याप्रक्रिया अंतर्गत प्रथमस्तरीय सरमिसळमध्ये २८९७ बॅलेट युनिट आणि २८९७ कंट्रोल युनिट आणि ३१३८ व्हीव्हीपॅटचे वाटप विधानसभा मतदार संघांना केले. हे मतदान यंत्र विधानसभा निहाय वाटप करणेकरीता गोदाम उघडण्याची परवानगी व ईव्हीएममशीन्स विधानसभा निहाय स्थलांतर करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे आज २२८-गेवराई, २२९-माजलगाव, २३०- बीड, २३१-आष्टी, २३२-केज, २३३-परळी विधानसभा मतदार विभागासाठी ईव्हीएम व व्हीव्हीपॅट मशिन्सचे प्रथम सरमिसळ (१ ) करण्यात आली आलेली आहे. आता या सरमिसळ (१ ) प्रक्रियेनंतर या ईव्हीएम व व्हीव्हीपॅट मशीन भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे आणि विहित कार्यपद्धतीप्रमाणे योग्य त्या सुरक्षित ठिकाणी ठेवण्यात येणार आहेत.



# सिंदफणा आश्रम शाळा अभिनव उपक्रमात अग्रेसर-गवळी

## विद्यार्थ्यांनी टाकाऊ वस्तुंपासून बनवले १०० आकाश कंदील

शिरूर । प्रतिनिधी

तालुक्यातील सिंदफणा प्राथमिक व माध्यमिक विद्यालयाच्या वतीने संस्थेचे सचिव राजकुमार पालवे यांच्या मार्गदर्शनाखाली एक पाऊल आत्मनिर्भरेकडे...हे ब्रीद वाक्य घेऊन शिक्षकांच्या संकल्पनेतुन शाळेतील १०० विद्यार्थी व विद्यार्थीनी यांनी दिवाळी निमित्त टाकाऊ वस्तुपासून आकाश कंदील बनवले असून याप्रसंगी शाळेबद्दल कौतुक करतांना सामाजिक कार्यकर्ते आजीनाथ गवळी म्हणाले की हि शाळा अशा नवनवीन अभिनव उपक्रमासाठी सर्वात अग्रेसर आहे.यावेळी व्यासपिठावर जेष्ठ पत्रकार गोकुळ पवार,सामाजिक कार्यकर्ते समिर पठाण यांची उपस्थिती होती.

या आकाश कंदील प्रदर्शनाचे उद्घाटन संग्राम सेवाभावी संस्थेचे सचिव राजकुमार पालवे यांच्या हस्ते संपन्न झाले.तर या प्रदर्शनामधे शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी दिवाळी पूर्वी टाकाऊ वस्तु पासून तसेच पर्यावरणास हातभार लावणाऱ्या वस्तू पासून घरी आकाश कंदील बनवलेले ही स्पर्धा दिनांक ११ ऑक्टोबर २०२४ ते दिनांक १८ ऑक्टोबर २०२४ पर्यंत आयोजित केली होती.दिनांक १९ ऑक्टोबर २०२४ रोजी शाळेच्या प्रांगणामध्ये आयोजित आकाश कंदील प्रदर्शनात विद्यार्थी यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. यावेळी प्राथमिक गटात १.भोसले राम भाऊसाहेब प्रथम २. गोल्हार यशश्री भारत द्वितिय ३.जिरेकर शुभम हनुमंत तृतीय ४.खेडकर वृषाली संभाजी उत्तेजनार्थ व माध्यमिक गटात १.सार्थक वसंत जायभाये प्रथम क्रमांक २ यश अंबादास जायभाये द्वितीय क्रमांक ३ शिवकन्या हनुमंत जिरेकर तृतीय क्रमांक तसेच ४ तुषार ज्ञानेश्वर कातखडे उत्तेजनार्थ अशा वरील सर्व विद्यार्थ्यांना पारितोषिकासह डिजिटल प्रमाणपत्राने सन्मानित करण्यात आले.याचबरोबर अन्य सहभागी ८० विद्यार्थ्यांना सन्मानासह डिजिटल प्रमाणपत्र उपस्थित मान्यवरांच्या हस्ते वितरित करण्यात आले.या प्रदर्शनामधील प्राथमिक गटातील गुण मूल्यांकन श्री.संजय ढाकणे सर, कल्याण उनवणे,कचरू नेटके सर व श्री सुनील तावरे सर यांनी केले तर माध्यमिक गटातील गुण मूल्यांकन श्री दीपक साखरे सर, श्री रमेश जायभाये ,आर्चना संकये मॅडम, श्री विजय आंधळे सर यांनी पार पाडली.




पारितोषिक वितरण सोहळ्यामध्ये सामाजिक कार्यकर्ते आजिनाथ गवळी यांनी शाळेतील निवासी व अनिवासी विद्यार्थ्यांचे भरभरून कौतुक करुन हि शाळा अभिनव उपक्रमामधे अग्रेसर असल्याचे सांगीतले.तसेच ग्रामीण भागातील भटक्या विमुक्तांच्या विद्यार्थ्यांसाठी चालवल्या जाणाऱ्या या सिंदफणा आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना भविष्यामध्ये आत्मनिर्भर होण्यासाठी चे व्यावसायिक शिक्षण या माध्यमातून मिळते तसेच तालुक्यातील एकमेव असणाऱ्या या आश्रम शाळेत नेहमीच विद्यार्थ्यांना पोषक असे विविध प्रकारचे नव उपक्रम राबवले जातात व शाळेतील शिक्षक सातत्याने मेहनत घेतात ही अभिमानाची गोष्ट आहे असे मत व्यक्त केले.यावेळी हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सिंदफणा प्राथमिकचे मुख्याध्यापक श्री किशोर गुंडसर व माध्यमिकचे मुख्याध्यापक श्री गहिनीनाथ खरमाटेसर,शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी श्री देवराव मस्के सर,श्री किशोर खरमाटे सर, श्री अशोक काटे सर श्री शिवाजी कदम, श्री अर्जुन पालवे आदींनी परीश्रम घेतले. कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन श्री महादेव कातखडे सर यांनी केले तर आभार श्री कल्याण उनवणे सर यांनी मानले.

# माजी सैनिक कुटुंबीय संरक्षण समिती सदस्यपदी हाजी सय्यद इस्माईल

धारूर। प्रतिनिधी

गृह विभाग महाराष्ट्र शासन मुंबई यांच्या आदेशान्वये बीड जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्या वतीने नुकतीच जिल्हास्तरीय सैनिक व माजी सैनिक कुटुंबीय संरक्षण समिती गठीत करण्यात आली. या समितीच्या सदस्यपदी धारुर येथील निवृत्त सुभेदार हाजी सय्यद इस्माईल यांची निवड करण्यात आली. त्यांच्या निवडीचे सर्वत्र स्वागत करुन अभिनंदन होत आहे.

देशाच्या सीमेवर हिमालय पर्वतासारखे भक्कम उभे राहून भारत देश व सर्व भारतीयांना सुरक्षीत ठेवण्यासाठी जिवाची बाजी लावणाऱ्या सैनिक व माजी सैनिक यांच्या कुटुंबीयांना येणाऱ्या विविध अडी अडचणी सोडविण्यासाठी गृह विभाग महाराष्ट्र शासन मुंबई यांच्या आदेशान्वये बीड जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्या वतीने नुकतीच बीड जिल्हास्तरीय सैनिक व माजी सैनिक कुटुंबीय संरक्षण समिती गठीत करण्यात आली. या समितीच्या अध्यक्षपदी पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ हे असणार आहेत.



या समितीच्या सदस्यपदी धारुर येथील निवृत्त सुभेदार हाजी सय्यद इस्माईल यांच्यासह बीड जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातून एक अशा इतर अकरा माजी सैनिकांची या समितीत निवड करण्यात आली आहे. हाजी सय्यद इस्माईल यांच्या निवडीबद्दल माजी सैनिक संघटनेसह सर्वस्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

राज्य लोकतंत्र


# परळी नगर पालिकेने वसूल केलेल्या १०० कोटी रुपयांच्या अनधिकृत एक टक्का कराच्या पावत्या झेरॉक्स संपर्क कार्यालयात जमा करा

## राजेभाऊ फड यांचे परळीतील जनतेला आवाहन; न्याय मिळेपर्यंत पाठपुरावा करणार

परळी । प्रतिनिधी

परळी नगर पालिकेकडून अतिरिक्त शुल्क आकारण्यात येत असल्याबाबत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे युवा नेते राजेभाऊ फड यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात जनहित याचिका दाखल केली आहे. परळी नगर पालिकेने जनतेची गैर कायदेशीर मार्गाने जवळपास १०० कोटी रुपयांची फसवणूक केली आहे. वास्तविक पाहता अशा स्वरूपाचा कर घेण्याबाबत कुठलेही आदेश नाहीत किंवा कुठलाही शासन आदेश नाही. मालमत्ता करासाठी शासन नियमानुसार भरलेल्या पैशांपेक्षा एक टक्का अतिरिक्त शुल्क नगर पालिकेकडून वसूल केले जात आहेत. हा प्रकार नियमबाह्य असून, हेच पैसे जनतेला परत करा व यापुढे असा कर वसूल केला जाऊ नये अशी मागणी याचिकेद्वारे करण्यात आली आहे. यासंदर्भात न्यायालयीन लढाई सुरू असून,




मागील पाच वर्षांत याची झळ सोसलेल्या नागरिकांनी कर भरलेल्या पावत्या संपर्क कार्यालयात आणून द्याव्यात असे आवाहन त्यांनी केले आहे.

परळी वैजनाथ नगरपरिषद परळी वैजनाथ या कार्यालयात मालमत्तेची नोंदणी करण्यासाठी नाव नोंदणी अर्ज दाखल केल्या नंतर सदरील मालमत्तेच्या नावाची नोंदणी प्रमाणपत्र देते वेळी अनाधिकृतपणे कर आकाराला जातो व शहरातील नागरिकांवर त्याचा विनाकारण भुर्दंड पडतो. अशा प्रकारचा कर आकारण्याची कोणतीही तरतूद नगरपरिषद कायद्यामध्ये, नियमा मध्ये व शासन निर्णयामध्ये नसतानाही सामान्य नागरिकांना वेठीस धरून अशा प्रकारची कर वसुली परळी नगरपरिषद कार्यालयामार्फत केली जाते अन्यथा त्यांच्या मालमत्तेची नोंद नगरपरिषद कार्यालयामध्ये घेतली जात नाही. नाइलाजास्तव परळी

शहरातील नागरिकांना इच्छा नसतानाही कर भरावा लागतो. सदरील कराबद्दल राजेभाऊ श्रीराम फड यांनी वेळोवेळी मुख्य अधिकारी परळी नगरपरिषद परळी वैजनाथ यांच्याकडे लेखी अर्ज देऊन सदरील कराबद्दलची माहिती मागितली असता त्यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केली शेवटी दिनांक २४/०६/२०२४ रोजी केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये सदरील काराबद्दल माहिती मिळवण्यासाठी अर्ज दाखल केला असता मुख्य अधिकारी परळी नगरपरिषद यांनी सदरील कराबाबत माहिती दिली नाही व वर्षानुवर्षे अशा प्रकारचें अनाधिकृतपणे कर वसुली करत आहेत. याबाबत उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात न्यायालयीन लढाई सुरू आहे. नगर पालिकेने अनधिकृतपणे वसूल केलेल्या कराची रक्कम नागरिकांना तत्काळ परत करावी व यापुढे हा प्रकार थांबवावा अशी मागणी राजेभाऊ फड यांनी केली आहे. तर मागील पाच वर्षांत नागरिकांना याची मोठ्या प्रमाणावर झळ बसली आहे. अनधिकृत एक टक्का वाढीव भरावा लागलेल्या नागरिकांनी कर भरलेल्या पावत्या असतील तर त्या आमच्या संपर्क कार्यालयात जमा कराव्यात असे आवाहन केले आहे.

## अर्जुन खोतकर यांच्या उपस्थितीत हजारो कार्यकर्त्याचा शिवसेनेत प्रवेश



जालना । प्रतिनिधी

**शिवसेनेचे नेते तथा माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर यांच्या नेतृत्वाखाली आज अनेक जणांनी शिवसेनेत प्रवेश केला. प्रवेश कर्त्यांना उद्देशून श्री. खोतकर यांनी त्यांचे सर्व प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन यावेळी दिले.**

यावेळी बोलतांना शिवसेना नेते तथा माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर म्हणाले की, आज एवढ्या संख्येने हा प्रवेश सोहळा पार पडत आहे, त्याचे आपण कौतूक करतो. शिवसेनेत ज्यांनी- ज्यांनी प्रवेश घेतला, त्यांचे म्हणणे आपण निश्चितच खाली जाऊ देणार नाहीत. याची जाणीव प्रत्येकाने ठेवावी. मग तो वीजेचा प्रश्न, नाल्यांचा प्रश्न असो की, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न असो. हे सर्व प्रश्न मार्गी लावणार असल्याचे श्री. खोतकर यांनी सांगितले. प्रवेश करणार्यांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर फाउंडेशन चे सिद्धार्थ आंबोरे, शुभम अंभोरे, महादू पोळ अमोल गंगा तिवरे असं फाउंडेशनचे शेकडो कार्यकर्ते व अजय कुरिलिये,यांच्यासह त्यांचे मित्र मंडळाचे निलेश काकडे, लखन नागरे, सागर तुरे, यांनी प्रवेश केला तसेच नवीन मोंढ्याया पाठीमागे आनंदनगर व संताजी नगर या मध्ये अद्यापही लाईटची सुविधा नाही, आदी अनेक समस्या असून त्याचा विचार करावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. तसेच यावेळी शाकीर खान व असलम मदनी यांनी शेकडो कार्यकर्त्यांसह शिवसेनेत पक्ष प्रवेश केला. या सर्वांचा पुष्पहार देऊन श्री. खोतकर यांनी सत्कार केला. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर फाऊंडेशनच्या पदाधिकार्यांनीही यावेळी शिवसेनेत प्रवेश केला. या सर्व कार्यकर्त्यांचे माजी मंत्री अर्जुनराव खोतकर यांनी सत्कार केला. तसेच यावेळी शेकडो शिवसैनिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए)च्या मराठवाडा कार्याध्यक्षपदी भगवंत वायबसे




केज । प्रतिनिधी

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया(ए)च्या मराठवाडा कार्याध्यक्षपदी कासारी चे भूमिपुत्र भगवंत (अप्पा) अशोक वायबसे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

राष्ट्रीय अध्यक्ष दीपक भाऊ निकाळजे यांच्या हस्ते व महाराष्ट्र राज्याच्या महिला प्रदेशाध्यक्ष सुनिताताई चव्हाण, राज्य कार्याध्यक्ष बाळासाहेब पवार आदींच्या हस्ते भगवंत वायबसे यांना नियुक्तीपत्र देऊन सन्मान करण्यात आला.

या निवडीबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे. यापूर्वी चळवळीत सक्रिय राहुन त्यांनी काम केले आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्न यासाठी आंदोलन उपोषण अशा विविध मार्गाने सामान्यांच्या प्रश्नासाठी ते झगडत असतात याची दखल घेऊन त्यांची कार्याध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. यापुढे रिपब्लिकन चळवळ वाढवण्यासाठी काम करत राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. निवड बैठकीस पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## प्रियदर्शनी सहकारी बँकेकडून कर्मचाऱ्यांना वीस टक्के बोनस

जालना । प्रतिनिधी

**केवळ जालना जिल्ह्यातच नव्हे तर संपुर्ण मराठवाडा आणि महाराष्ट्रात नामांकित प्रियदर्शनी नागरी सहकारी बँकेने आपल्या कर्मचाऱ्यांना २० टक्के दिवाळी बोनस देण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे कर्मचाऱ्यांची दिवाळी मोठ्या उत्साहात साजरी होणार.यासंदर्भात बँकेतर्फे प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात पुढे म्हटले आहे की, बँकेच्या सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना दिवाळी सणानिमित्त एका पगारवाढ, २० टक्के बोनस आणि ५० टक्क महागाई भत्ता देण्याचा निर्णय संचालक मंडळाने घेतला आहे.**



जालना परिसरात नावाजलेली बँक आणि ग्राहक, खातेदार, सभासद यांना अत्याधुनिक बँकींग सोयी- सुविधा पुरवणारी नागरी सहकारी बँकच्या सर्व अधिकारी, कर्मचारी शिपायासह सर्वांना हा लाभ मिळणार आहे. विशेष म्हणजे प्रियदर्शनी नागरी सहकारी बँकेला आजपर्यंत सर्वच क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी ल्याबद्दल अनेक मान्यवर संस्थांकडून अगदी प्रतिष्ठेचे पुरस्कार देखील मिळालेले आहेत. बँकेच्या या प्रगतीत संचालक मंडळासह बँकेचे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा सिंहाचा वाटा असल्याबद्दल बँकेने वरीलप्रमाणे बोनस देण्याचा निर्णय जाहीर केला. दरम्यान, या महत्वपुर्ण निर्णयाबद्दल सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी चेअरमन सीए. भुषण भक्कड, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. सचिन वाणी व सर्व संचालक मंडळाचे आभार मानले आहे.

## शिर्डी एक्सप्रेस लुटीचा मोठा प्रयत्न फसला

परळी । प्रतिनिधी

काकीनाडा-नागरसोल शिर्डी एक्सप्रेस रविवार रोजी मध्यरात्री परळी जवळच असलेल्या वडगाव दादाहरी येथे सिग्नल मध्ये तांत्रिक बिघाड करून लुटण्याचा प्रयत्न रेल्वे सुरक्षा दलाच्या सतर्कतेमुळे असफळ ठरला असून यामध्ये एका कोच मधील दोन महिलांचे दागिने चोरट्यानी लुटले असल्याची माहिती मिळत असून याबाबत अद्याप रेल्वे पोलिसात अधिकृत गुन्हा दाखल झालेला नाही.



ट्रेन नंबर १७२०६ काकीनाडा ते नागरसोल धावणारी शिर्डी एक्सप्रेस परळी जवळील वडगाव दादाहरी येथे परळीचा दिशेने असलेल्या आउटर सिग्नलला चोरट्यानी तांत्रिक बिघाड करून उभी केली.अंदाजे ७-८ चोरट्यानी ही एक्सप्रेस लुटण्याचा प्रयत्न केला.ट्रेन मध्ये कर्तव्यावर असलेल्या रेल्वे सुरक्षा दलाच्या पोलीस कर्मचाऱ्यांनी दाखवलेल्या सतर्कतेमुळे

चोरट्यांचे रेल्वे लुटीचे मनसुभे उधळून लावत चोरट्याना पळवून लावले. यामुळे रेल्वे लुटीचा मोठा अनर्थ टळला.या घटनेत एका बोगी मध्ये २ महिलांचे दागिने चोरट्याने लंपास केली अशी माहिती समोर आली असून याबाबत अधिकृत दुजोरा मिळालेला नाही अथवा रेल्वे पोलिसात कसलाही प्रकारचा गुन्हा नोंद करण्यात आला नाही.

सदरील घटनास्थळ हे सोनपेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत येत असून वारंवार या ठिकाणी घडत असलेल्या घटनेची दखल घेत लोहमार्ग पोलीस उप विभागीय पोलीस अधिकारी लोहकरे लोहमर्ग स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस कर्मचारी यांनी घटनस्थळाला भेट देऊन सुरक्षाचे दृष्टीने योग्य त्या सूचना दिल्या याप्रसंगी परळी लोहमार्ग पोलीस स्टेशन चे सहायक पोलीस निरीक्षक सोमनाथवाघमोडे व स्थानिक गुन्हे शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक प्रशांत गंभीरराव,रेल्वे सुरक्षा बलाचे सब इन्स्पेक्टर कांबळे,पोलीस अमलदार संजय भेंडेकर, परळी रेल्वे पोलीस ठाण्याचे क्राईम शाखेचे अनंत कांबळे. कोंडीराम सातपुते. आदी उपस्थित होते.

## प्रस्थापित व लुटारु पुढाऱ्यांना हद्दपार करुन नविन पर्याय समोर आणणार -उत्तमराव माने

परळी । प्रतिनिधी

परळी विधानसभा निवडणुकीत प्रस्थापित व लुटारु पुढार्यांना हद्दपार करुन नविन पर्याय समोर आणण्याचा निर्धार सर्वसामान्य मतदारांनी केला असल्याचे ज्येष्ठ नेते उत्तमराव माने यांनी सांगितले.



परळी शहर व परिसरात विद्यमान सत्ताधारी पुढार्यांनी अभुतपुर्व दहशत माजवली असुन याचा सर्वसामान्य जनतेला प्रचंड त्रास होत आहे. केवळ मोठमोठ्या गप्पा व आश्वासने देणार्या या प्रस्थापित पुढार्यांनी परळी मतदार संघाचा कुठलाही विकास केला नाही. किंवा गोरगरीब तसेच तरुणांना रोजगार मिळेल यासाठी कुठलेही नविन प्रकल्प उभे केले नाहीत. सत्तेतुन पैसा व पैशातुन सत्ता मिळवणे ऐवढाचा कार्यक्रम गेल्या कांही वर्षांत पहावयास मिळत आहे. विकासाच्या नावावर प्रचंड लुट सर्रास चालु आहे. सत्तेच्या जोरावर सामाजिक व राजकीय क्षेत्रात काम करणार्यांना खोट्या केसेस मध्ये अडकुन गुन्हे दाखल करुन त्रास देण्याचे काम सर्वसामान्य जनता उघड्या डोळ्याने पाहत आहे. आता हे अती झाले असुन डोक्यावुन पाणी वाहत आहे. त्यामुळे विद्यमान प्रस्थापित व लुटारु पुढार्यांना हद्दपार करण्याचा निर्णय परळी विधानसभा मतदार संघातील सर्वसामान्य जनतेने घेतला असुन या संदर्भात अनेक गुप्त बैठका होवुन परळी विधानसभेत सर्वसामान्य जनतेसाठी नविन पर्याय समोर आणुन निवडुन आणण्याचा निर्धार मतदारांनी केला असल्याचे उत्तमराव माने यांनी म्हटले आहे.

## सांगवी पाटण येथे हरिनाम सप्ताहाची उत्साहात सांगता

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील सांगवी पाटण येथे ५४ वा अखंड हरिनाम सप्ताह ह.भ.प सुदर्शन महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली व ह.भ.प काशिनाथ महाराज शास्त्री यांच्या अध्यक्षतेखाली दसऱ्याच्या मुहूर्तावर प्रारंभ झाला होता, काल ढोल, ताशा , हलगी पथक , लेझिम, जेसीपी ने फुलांची उधळण करण्यात आली, ना भुतो, ना भविष्य अशा सप्ताह सोहळ्याची उत्साहात सांगता झाली.

महाराष्ट्र ही संतांची भूमी असून, या भूमीला खर्या अर्थाने संत परंपरेच अनुष्ठान लाभलं आहे. म्हणन संत परंपरेमुळे महाराष्ट्राला मोठा वारसा लाभला आहे. याच जोरावर हा वारकरी संप्रदाय आजही ठीकवून आहे. म्हणनच भगवंताच्या कृपेने साधुसंताचा आशीर्वादाने गावकऱ्यांनी महंत ह.भ.प सुदर्शन महाराज व भागवताचार्य काशिनाथ महाराज शास्त्री याची रथावर भव्य दिव्य मिरवणूक काढली.



काल्याचे किर्तन ह.भ.प काशिनाथ महाराज शास्त्री यांच्या काल्याच्या कीर्तनाने सांगत होत महाप्रसादाचा ग्रामस्थांनी आस्वाद घेत मोठ्या उत्साहात संपन्न झाला.या अध्यात्मिक, पारमार्थिक ज्ञानयज्ञ सोहळयात गेली सात दिवस महाराष्ट्रातील अनेक नामवंत कीर्तनकारांची किर्तन झाली, तसेच सातव्या दिवशी सायंकाळी दिपवंदन होतं, काल्याच्या दिवशी दिंडी प्रदक्षणा झाली तसेच सात दिवस विशेष योगदान देणाऱ्या, सर्व गायक-वादक, गावातील युवा महिला कीर्तनकार, सर्वगुणीजन मंडळींना महाराजाच्या हस्ते नारळ देण्यात आली. व नतंर परिसरातील शेकडो नागरिक, ग्रामस्थ यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये महाप्रसादाच्या कार्यक्रमाने सांगता झाली.

यावेळी परिसरातील सामाजिक, राजकीय, धार्मिक क्षेत्रातील, अनेक ज्येष्ठ प्रतिष्ठित मान्यवर व गावातील अनेक महिला भगिनी, पुरुष, तरुण बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सर्वांचे सांगवी पाटण ग्रामस्थांनी आभार मानले.




**पुण्यात अण्णांचे सर्वत्र जंगी स्वागत...**द्रौपदा लॉन्स , वाकड येथे आष्टी - पाटोदा - शिरूर कासार मतदार संघातील पुणे येथे राहणाऱ्या नागरिकांचा कौटुंबिक स्नेह मेळावा माजी मंत्री सुरेश अण्णा धस यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात आला होता. नोकरी व्यवसायाच्या निमित्ताने अनेक नागरिक पुण्यात स्थायिक असून या स्नेह मेळाव्यात एकमेकांच्या भेटी-गाठी दरम्यान 'गावची' आपुलकी प्रकट झाली. आणि उपस्थितात एक उत्साह पाहायला मिळाला.

## मतदारसंघाप्रमाणेच पुण्यातही नागरिकांची गर्दी, सर्वत्र सुरेश धसांचे जंगी स्वागत!

पुणे । प्रतिनिधी

आष्टी तालुक्याच्या सर्वांगीण विकासाचे स्वप्न घेऊन आपण राजकारणात आलो सरपंच झालयापासून जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष झाल्यानंतर जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाकडे लक्ष देऊन दर्जेदार शिक्षण घेण्याचा प्रयत्न केल्यामुळे तात्कालीन पहिली ते सातवीतील असलेले विद्यार्थी आज पुणे जिल्ह्यामध्ये विविध क्षेत्रात स्थिरावले आहेत याचा आपणास अभिमान वाटत असून त्यांच्यासाठी काही करता आले याची समाधान वाटत आहे असे प्रतिपादन माजी राज्यमंत्री सुरेश धस यांनी केले आष्टी पाटोदा आणि शिरूर तालुक्यातील मूळ रहिवासी असलेल्या पुणे जिल्ह्यातील नागरिकांच्या वाकड, रूपीनगर,हडपसर आणि रांजणगाव येथे आयोजित कौटुंबिक स्नेह मेळाव्यामध्ये ते बोलत होते.

पुढे बोलताना धस म्हणाले की,पुणे जिल्ह्यातील विविध क्षेत्रात

### खुंटेफळ साठवण तलाव करत असताना अक्षरश: दगडे खाल्ली मात्र तरुसभरही मागे सरकलो नाही

आपल्याकडील लोक कार्यरत आहेत आयटी क्षेत्रात असतील व्यावसायिक क्षेत्रात असतील ड्रायव्हर क्षेत्रात देखील आपल्या भागातील मुले बहुसंख्येने आहेत जे की स्वतःची वाहने घेऊन या क्षेत्रात आलेली आहेत १९९९ पासून आज पर्यंत गोरगरिबांची शेतकऱ्यांची मुले शिक्षण घेत असलेल्या घेत असलेल्या जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाद्वारे दर्जेदार मिळावे यासाठी शैक्षणिक कार्यावर भर देत आलेलो आहे ज्यावेळेस मी पहिल्यांदा जिल्हा परिषदेचा उपाध्यक्ष झालो त्यावेळेस शिक्षकांचा तुटवडा आणि असलेल्या रिक्त जागा मला जाणवत होत्या त्यात तात्काळ भरण्यासाठी मी जिल्हा परिषदेचा उपाध्यक्ष असल्याने तत्कालीन जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांनी मला या निर्णयासाठी सर्वाधिकार दिले आणि त्यावेळेस एक हजार शिक्षकांची मेगा भरती करण्याचे काम पहिल्यांदा मी केलं २००१ ते २००५ पर्यंत ही रमणी पॅटर्न लागू केला ३० टक्के गुणवत्ता असलेल्या शाळा त्या २००५ साली ६८.६०% पर्यंत गेल्या आणि याच कालावधीमध्ये असलेले पहिले ते सातवी वर्गातील मुलं आज आपल्याला पुणे जिल्ह्यात विविध क्षेत्रात काम करताना दिसत आहेत माझ्या मतदारसंघातील जरेवाडी ची ३० विद्यार्थी पटसंख्या असलेली शाळा आज १३०० विद्यार्थ्यांची झालेली आहे आज त्या शाळेत विद्यार्थ्याला प्रवेश घ्यायचा असेल तर त्याला वेटिंग आहे शिवाय कोतन येथील शाळा देखील त्याच धर्तीवर मार्गक्रमण करत आहे त्या ठिकाणचे ◀◀ पान ३ वर

## लोणीकर यांना भाजपकडून सातव्यांदा उमेदवारी



जालना । प्रतिनिधी

परतुर विधानसभा मतदारसंघातून भाजपकडून सातव्यांदा बबनराव लोणीकर यांना उमेदवारी जाहीर यावेळी बोलताना बबनराव लोणीकर म्हणाले की ४० हजार मताच्या लीडने निवडून येणार असल्याचा आमदार बबनराव लोणीकरांचा दावा आहे. उमेदवारी जाहीर केल्यामुळे

पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमितजी शहा उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस चंद्रशेखर बावनकुळे यांचे मांनले आभार

परतूर विधानसभा मतदारसंघात सर्वसामान्य गोरगरीब जनतेची सेवा करण्याची संधी मला सातव्यादा दिल्या बद्दल मी देशाचे यशस्वी लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्रजी मोदी , ग्रहमंत्री अमितची शहा, उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस भारतीय जनता पक्षाचे महाराष्ट्र राज्याचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचे मी आभार मानतो अशी प्रतिक्रिया महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री तथा परतुर विधानसभा मतदारसंघाचे आमदार बबनराव लोणीकर यांना भारतीय जनता पक्षाने ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# आरपीआयचे शिष्टमंडळ घालणार अजित पवारांना साकडे



पिंपरी,(प्रतिनिधी) - अनुसूचित जाती प्रवर्गाकरिता राखीव असलेल्या पिंपरी विधानसभा मतदार संघाच्या जागची रस्सीखेच वाढली आहे. ही जागा आरपीआय आठवले गटाला सोडावी, या मागणीकरिता महायुतीमधील घटक पक्ष असलेल्या आरपीआयचे शहर व प्रदेश पदाधिकारी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेणार आहेत. याकरिता अजित पवार यांची भेट घेण्याचे नियोजन केले जात आहे. आरपीआयचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीयमंत्री रामदास आठवले यांच्याशी चर्चा केल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला आहे. पिंपरी विधानसभा मतदार संघात सर्वच राजकीय पक्षात दिवसेंदिवस इच्छूकांची संख्या वाढत आहे. राज्यातील सार्वत्रिक विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर राजकीय घडामोडींना वेग आला आहे. तर महायुतीमधील घटक पक्ष असलेला आरपीआय हा पिंपरी विधानसभेच्या जागेकरिता आग्रही आहे. या मतदार संघात आरपीआयची ताकद असून, या मतदार संघात विजय मिळविण्याचा पदाधिकार्यांना विश्वास वाटत आहे. दरम्यान, महायुतीच्या जागा वाटपात प्रदेश पातळीवरील पदाधिकार्यांनी भाजपकडे केलेल्या जागांच्या मागणीमध्ये पिंपरी मतदार संघ अग्रक्रमावर आहे. तर महायुतीच्या जागा वाटपात काही ठिकाणी होणार्या जागा बदलाचा फायदा पिंपरी विधानसभेत होईल, अशी पदाधिकार्यांना आशा आहे.

दरम्यान, राष्ट्रवादीचे विद्यमान आमदार आण्णा बनसोडे हे या मतदार संघाचे प्रतिनिधित्व करत असून, आगामी विधानसभा निवडणुकीत विद्यमान आमदाराला याठिकाणी संधी मिळण्याचा जागा वाटपाचा महायुतीचा फॉर्म्युला ठरला आहे. या बाबीची आरपीआयला काहीशी अडचण होत आहे. या जागेचे दावेदार असलेले भाजप पदाधिकारी अमित गोरखे यांची विधानपरिषदेवर वर्णी लागल्यानंतर हा मतदार संघ आरपीआयलाच मिळणार असल्याचे बोलले जात होते. त्याकरिता भाजप व आरपीआय पदाधिकार्यांची बैठकही झाली आहे. आता सार्वत्रिक विधानसभेच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर जागांवर उमेदवार ठरविण्यावर सर्वच राजकीय पक्षांचा कल आहे. तर केंद्रीय मंत्री रामदास आठवलेदेखील आपले राजकीय वजन वापरून हा मतदार संघ आरपीआयला मिळावा, याकरिता वरिष्ठ पातळीवर प्रयत्न करीत आहेत.

या पार्श्वभूमीवर शहर व प्रदेश पदाधिकार्यांच्या शिष्टमंडळाने शुक्रवारी (दि.१८) आठवले यांची मुंबईत भेट घेतली. या भेटीदरमन झालेल्या चर्चेत भाजपच्या वरिष्ठ पातळीवर पिंपरी विधानसभा मतदार संघाची मागणी केली जात असून, उपमुख्यमंत्री अजित पवार यांचेदेखील मन वळविण्यासाठी त्यांची भेट घेण्याची सूचना आठवले यांनी या शिष्टमंडळाला केली त्यानुसार अजित पवार यांच्या भेटीचे नियोजन केले जात आहे.

या शिष्टमंडळात पिंपरी चिंचवड शहराचे शहराध्यक्ष कुणाल वाव्हळकर, महिला प्रदेशाध्यक्ष चंद्रकांता सोनकांबळे, पश्चिम महाराष्ट्राचे उपाध्यक्ष सिकंदर सूर्यवंशी, सम्राट जकाते, माजी स्वीकृत सदस्य राजेंद्र कांबळे, सरचिटणीस दयानंद वाघमारे, योगेश भोसले, संभाजी वाघमारे, अक्षय दुनघव, बापू सरोदे, दिलीप थोरात, संदीप तोरणे, अतुल जाधव, कृष्णा जाधव, राजू गायकवाड, कमल कांबळे, लता लगाडेयांचा समावेश होता.

# विघ्नहर विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा

## १४ वर्षे मुलांची राज्यस्तर व्हॉलीबॉल स्पर्धेकरिता निवड

ओझर । प्रतिनिधी

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या श्री विघ्नहर विद्यालय ओझरच्या १४ वर्ष वयोगटातील मुलांच्या संघाने विभागीय स्तरावर व्हॉलीबॉल स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक मिळवत राज्यस्तरीय स्पर्धेकरिता दिमाखात प्रवेश मिळविला असल्याची माहिती विद्यालयाचे मुख्याध्यापक सुधीर दांगट सर यांनी दिली.

महाराष्ट्र राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय व जिल्हा क्रीडा परिषद पुणे आयोजित विभागीय पातळीवरील व्हॉलीबॉल स्पर्धा पुरंदर हायस्कूल,सासवड येथे पार पडल्या. चुरशीच्या झालेल्या सामन्यांमध्ये पुणे शहर, पिंपरी चिंचवड या संघांचा पराभव करून फायनलमध्ये नगर ग्रामीण अशा मातब्बर संघांवर मात करून




विघ्नहर विद्यालयाच्या १४ वर्षे वयोगटातील मुलांनी विजेतेपद पटकावले आणि राज्यपातळीवर दिमाखात प्रवेश मिळविला आहे.

या खेळाडूंमध्ये स्वराज जगदाळे, अथर्व कुटे, ओमकार टेंभेकर, संस्कार भोर, देवांग हांडे, वेदांत हांडे, अन्वय भागवत, सोहम वाळुंज, वेदांत ग. टेंभेकर, रवींद्र काकडे, सुजल मांडे, वेदांत सं. टेंभेकर यांचा समावेश आहे. या विद्यार्थ्यांना क्रीडाशिक्षक गणेश राऊत सर यांनी मार्गदर्शन केले आहे. मार्गदर्शक आणि संघातील खेळाडूंचे श्री विघ्नहर गणपती देवस्थान ट्रस्ट चे अध्यक्ष बाळासाहेब कवडे, उपाध्यक्ष तुषार कवडे, सचिव सुनील घेगडे, खजिनदार दत्तात्रय कवडे तसेच सर्व विश्वस्त, दोन्ही गावचे सरपंच राजश्री कवडे, तारामती कर्डक, सदस्य, समस्त ग्रामस्थ यांनी अभिनंदन केले.

# फर्ग्युसन महाविद्यालयातील दोन विद्यार्थ्यांचा बंधाऱ्यात बुडून मृत्यू

मुळशी । प्रतिनिधी

मुळशी तालुक्यात खांबोली येथील तलाव येथे फिरण्यासाठी आलेल्या ओजस आनंद कठापुरकर ( वय २२, वर्ष रा प्राधिकरण निगडी पुणे) आणि राज संभाजी पाटील ( वय २२, रा अमळनेर जळगाव) या दोन महाविद्यालयीन तरूणाचा बुडून मृत्यू झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार,फर्ग्युसन कॉलेज येथे शिकणारे आदेश राजेंद्र भिडे,सुमेध सतीश जोशी, प्रशांत संभाजी आरगडे,तेजस्विनी साहेबराव पवार,निधी सत्यनारायण हळदंडकर,तृप्ती चंद्रकांत देशमुख,चैतन्या जयंत कांबळे,ओजस आनंद कठापुरकर आणि राज संभाजी पाटील हे नऊ जण दुचाकीवरून खांबोली तलावाजवळ फिरण्यासाठी सकाळी साडेनऊ वाजता आले होते. हे सर्व



पाण्यात उतरले होते.यावेळी ओजस आणि राज गाळात अडकले तर उर्वरित जण पाण्यातून बाहेर आहे. ओजस आनंद कठापुरकर याला पाण्यातून बाहेर काढले असता स्थानिक डॉंक्टरांनी त्याला जागेवरच मयत झाल्याची घोषित केले.तर राज संभाजी पाटील याचा अग्निशामक दलाच्या जवानानी शोध घेतला असता काही वेळाने त्याचाही मृतदेह मिळून आला. यावेळी पौडचे पोलिस संतोष गिरीगोसावी यांनी घटनास्थळाला भेट देऊन पाहणी केली. पोलिस हवालादार रविद्र नागटिळक, ईश्वर काळे, अमोल सूर्यवंशी, अग्नीशामकचे जवान व ग्रामस्थ यांनी मृतदेह बाहेर काढण्यासाठी मदत केली.मृतदेह शवविच्छेदन करण्यासाठी पौड ग्रामीण रूग्णालयात पाठविण्यात आले. या प्रकरणाचा पुढील तपास पौड पोलिस करत आहे.

# सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश डॉ.धनंजय चंद्रचूड यांनी मूळगावी दिली भेट

राजगुरुनगर : सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश डॉ.धनंजय चंद्रचूड यांनी मूळगावी श्रीक्षेत्र यमाई कनेरसर ता खेड येथे भेट दिली. यावेळी कनेरसर गावात त्यांना मोठी सुरक्षाव्यवस्था ठेवण्यात आली होती. भारताचे सरन्यायाधीश डॉ. धनंजय चंद्रचुड हे येत्या १० नोव्हेंबर रोजी सेवानिवृत्त होत असताना कनेरसर ग्रामस्थांच्या आग्रहास्तव नियोजित वेळेनुसार ते कनेसर येथे आले होते. त्यांनी त्यांच्या वडीलोपार्जित चंद्रचुड वाड्याला भेट देऊन पहाणी केली.

वाड्यातील देवघरातील लक्ष्मी नरसिंहाचे दर्शन घेऊन कुटुंबीयांची भेट घेत जून्या आठवणींना उजाळा दिला.येथील ग्रामदैवत कुलस्वामिनी यमाई देवीचे सरन्यायाधीश डॉ. धनजंय चंद्रचुड यांनी सपत्नीक दर्शन घेतले. सरन्यायाधीश यांच्या स्वागतासाठी गावातील ग्रामस्थासह पंचक्रोशीतील नागरीक तालुक्यातील विविध संस्थाचे पदाधिकारी वकील, शाळकरी विद्यार्थी उपस्थित होते. ग्रामस्थांच्या वतीने बाबाजी दौंडकर, लक्ष्मण ताम्हाणे यांनी सरन्यायाधीश चंद्रचूड आणि पत्नी कल्पना चंद्रचूड यांना मानपत्र देऊन सन्मानित केले.राजगुरुनगर बार असोसिएशनच्या वतीने अध्यक्ष अँड रोहिदास टाकळकर यांनी त्यांचा



सत्कार केला. कल्पना चंद्रचूड यांचा शासनाच्या वतीने तहसीलदार ज्योती देवरे यांनी सन्मान केला. सत्काराला उत्तर देताना सरन्यायाधीश डॉ. धनंजय चंद्रचूड म्हणाले, कनेरसर गावात प्रवेश केल्यापासून ते आता तुम्हा सर्वांशी संवाद साधेपर्यंत अतंर्मनात संत ज्ञोश्वरांची एक ओळ वारंवार व्यक्त होत आहे.आजी सोनियाचा दिनु ।वर्षे अमृताचा घनु ।।१।। त्याचे कारण म्हणजे, तुम्ही लोकांनी दर्शविलेले निरपेक्ष प्रेम, जिव्हाळा आणि आपुलकी,काळ बदलतो तस माणूस देखील बदलतो. आपल्या गावात किती बदल झाला आहे. मी लहान पणी येथे यायचो. प्रत्येक खेपेला आपल्या गावात किती बदल झाला आहे. किती प्रगती झाली आहे हे जाणून घ्यायचो. आपल्याला पूरक आणि पोषक बदल स्वीकारत विकसित होण्याचा प्रयत्न करतो. असे करताना, आपल्या मातीचा वारसा पुढे चालवत एक एक पिढी बदल स्वीकारत पुढे स्थलांतर करते. हे चिरंतन सत्य आहे. आयुष्यात एक एक पाऊल पुढे टाकत असताना खोलवर रुजलेली आपली नाळ आपली मूळ, आपण विसरत नाहीत.आपल्या मूळ गावी आज भेट देताना मला माझ्या पूर्वजांचा, माझ्या या गावाचा, या मातीचा या लोकांचा अभिमान वाटतो. कामाच्या व्यस्ततेमुळे मला येथे दर महिन्याला येता येत नाही. पण मला येथील गावकरी मेसेज द्वारे, पत्रव्यवहार करून संपर्क करत असतात. त्यांच्या अडचणी समस्या सांगत असतात. आपले पूर्वज या मातीतून घडले. त्यांचें ऋण आपण मानतो. त्यांची आठवण मनात साठवतो. कधी तरी काळाच्या ओघात प्रत्येक वेळी ते पुन्हा पाहण्याची तेथे भेट देण्याची सतत संधी मिळेलच असे नाही. सर न्यायाधीश चंद्रचुड पुढे म्हणाले ,आज माझ्या मूळ गावी भेट देताना ते माझ्यासाठी खूप आनंददायी आहे. मला तुम्हाला एक सांगायचं..! एक निरोप द्यायचा आहे. एक संदेश द्यायचा आहे. तो म्हणजे 'महिला सशक्तीकरणासाठी आठ वर्षांपूर्वी हे काम मी सर्वोच्च न्यायालयात केलं. महिलांना त्यांचे हक्क कसे देऊ शकतो. त्यांचे सशक्तीकरण कसे करु शकतो यावर भर दिला आहे. माझ्या निर्णयामुळे लष्करात महिला आज पर्मनंट कमिनर या पदावर काम करत आहेत.

# मांडवगणमधील विषबाधा प्रकरणाचा तपास थंडावला

शिरूर - मांडवगण फराटा (ता. शिरूर) येथील श्री वाघेश्वर विद्याधाम प्रशालेतील विद्यार्थिनीच्या पाण्याच्या बॉटलमध्ये पाण्यातील विषारी औषधाने विषबाधा झाली. मुलीला अत्यवस्थ अवस्थेत रुग्णालयात दाखल केले.



वेळीच उपचार केल्याने पुढील अनर्थ टळला असून तिची प्रकृती स्थिर आहे. हा त्रास शाळेच्या वेळेत शाळेत झाल्याने नक्की पाण्याच्या बाटलीत विषबाधा झाली, याबाबत प्रश्नचिन्ह अनुत्तरीत आहे.

या घटनेला बरेच दिवस उलटूनही अजून कोणताच ठोस निष्कर्ष निघाला नाही. या घटनेने शाळेतील विद्यार्थिनी- विद्यार्थी सुरक्षित नसल्याचे समोर आले आहे. पालकांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे. घटनेची तक्रार पोलिसांत मुलीच्या पालकांनी दिलेली नाही.

शाळेचे मुख्याध्यापक रामदास चव्हाण यांनी सांगितले की, आम्ही शाळेच्या वतीने पोलिसांत लेखी अर्ज केला आहे. याबाबत घटनेची गंभीरता लक्षात घेऊन चौकशी होऊन लवकरात लवकर सत्य समोर यायला हवे होते.

मुख्याध्यापक रामदास चव्हाण यांनी घटनेची माहिती दिली की मुलगी प्रार्थना संपल्यानंतर वर्गात आल्यानंतर तहान लागली म्हणून बाटलीचे झाकण उघडून पाणी प्याली. शेजारी असणाऱ्या मुलीला पाण्याचा उग्र वास आला.

याबाबत मुलांनी ही घटना वर्गशिक्षक याना ताबडतोब सांगितली. शिक्षकांनी मुलीला उपचारासाठी खासगी हॉस्पिटलमध्ये दाखल केले. वेळीच उपचार सुरु झाल्याने मुलीचे प्राण वाचले. डॉक्टरांनी पाण्यात विषारी औषध मिसळले असल्याचे सांगितले.

विद्यालयात ठिकठिकाणी सिसीटीव्ही कॅमेरे बसविले आहेत. परंतु नेमके घटनेच्या दिवशीच कॅमेरे बंद होते.

शाळेत वीजपुरवठा खंडित झाल्यानंतर वीजपुरवठा करणारी यंत्रणा नेमकी त्याच दिवशी नादुरुस्त असणे, घटनेच्या वेळी वर्गावर शिक्षक नसणे, तक्रार देण्यास विलंब लावणे, पालकांनी पोलिसांत तक्रार न देणे या प्रश्नांची उत्तरे मिळाली पाहिजेत अशी पालकांची अपेक्षा आहे. भविष्यात अशा प्रकारच्या कोणत्याही अनुचित घटना शाळेत घडू नयेत म्हणून काळजी घेणे गरजेचे आहे.

# पर्वती विधानसभेतून 'माधुरी मिसाळ' यांना पुन्हा संधी!

पुणे । प्रतिनिधी

महाराष्ट्र विधानसभा निवडणूकीसाठी भाजपने नुकतीच उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. यात पुण्यातील पर्वती विधानसभा मतदारसंघातून



माधुरी मिसाळ यांना पुन्हा एकदा संधी देण्यात आली आहे. माधुरी मिसाळ या पर्वती विधानसभेच्या सलग तीन टर्म आमदार असून यंदा त्या या मतदारसंघातून सलग चौथ्यांदा आमदारकीसाठी निवडणूक लढवणार आहेत.

माधुरी मिसाळ ह्या भाजपच्या उमेदवार म्हणून पर्वती मतदारसंघातून २००९, २०१४, आणि २०१९ मध्ये सलग तीनदा आमदार म्हणून निवडून आल्या आहेत. त्यांचे शिक्षण बीकॉम असून त्या २००७ पासून त्यांनी पुणे महापालिकेत नगरसेविका म्हणून काम केलं आहे. माधुरी मिसाळ पुणे शहर भाजपच्या अध्यक्ष देखील राहिल्या आहेत. त्यांच्या कारकिर्दीत पुणे महापालिकेत भाजपची सत्ता येण्यासाठी त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावल्याचे मानले जाते. विद्या सहकारी बँक आणि उद्यम सहकारी बँकेच्या संचालिका पदाचाही त्यांना अनुभव आहे. माधुरी मिसाळ म्हणाल्या, गेल्या पंधरा वर्षात पर्वती परिसरासाठी मी केलेल्या विकासकामांची साक्षीदार असलेले मतदार मला पुन्हा एकदा विधानसभेत प्रतिनिधित्व करण्याची संधी देतील, याची खात्री आहे.

### इच्छूकांची निराशा

**पर्वती विधानसभा मतदारसंघातून भाजप पक्षातील अनेक नेत्यांनी विधानसभेसाठी इच्छा दर्शवली होती. मिसाळ या तीन टर्म आमदार राहिल्याने पक्षाने यंदा भाकरी फिरवावी अशी इच्छा व्यक्त करण्यात येत होती. मात्र पक्षाने उमेदवारांच्या पहिल्याच यादीत मिसाळ यांना संधी दिल्याने इच्छूकांचा चांगलाच भ्रमनिरास झाला आहे.**

# 'आयटीआय'च्या प्रवेशासाठी मुदतवाढ

पुणे, : राज्यातील शासकीय आणि खासगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत (आयटीआय) प्रवेशासाठी ऑनलाइन अर्ज करण्यास येत्या बुधवारपर्यंत (ता. २३) मुदतवाढ देण्यात आली आहे. यापूर्वी दिलेल्या मुदतीत प्रवेश अर्ज करू न शकलेल्या विद्यार्थ्यांना समुपदेशन फेरीत प्रवेशाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी ही मुदतवाढ दिली असल्याचे व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे.

राज्यातील शासकीय आणि खासगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील शिल्प कारागीर योजनेंतर्गत ऑगस्ट २०२४ सत्रातील प्रवेश हे केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया पद्धतीने करण्यात येत आहेत. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेतलेल्या पुरवणी परीक्षेच्या निकालानुसार नव्याने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनाही प्रवेशाची संधी उपलब्ध व्हावी, यासाठी ही मुदतवाढ देण्यात आली आहे.

समुपदेशन फेरीत पात्र आणि नव्याने अर्ज भरलेल्या विद्यार्थ्यांची एकत्रित गुणवत्ता यादी बुधवारी (ता. २३) रात्री दहा वाजता प्रसिद्ध करण्यात येईल. कोणत्याही स्थितीत प्रवेश रद्द करण्याची सुविधा विद्यार्थ्यांना उपलब्ध राहणार नाही. यापूर्वी ऑगस्ट २०२४ च्या प्रवेश सत्रात कोणत्याही व्यवसायात प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांना पुनर्प्रवेश देण्यात येणार नाही, असे व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण विभागाचे संचालक सतीश सूर्यवंशी यांनी स्पष्ट केले आहे.

समुपदेशन फेरीसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांनी सर्व मूळ कागदपत्रांच्या पडताळणीनंतर संबंधित संस्थेत त्याचदिवशी प्रवेश घेणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी त्याचदिवशी प्रवेश निश्चित न केल्यास संबंधित जागा दुसऱ्या दिवशी रिक्त समजून प्रवेशासाठी खुल्या करण्यात येतील. तसेच, समुपदेशन फेरीसाठी दिलेल्या कालावधीत खासगी आयटीआयमधील संस्थास्तरीय प्रवेश फेरीनंतर रिक्त असलेल्या जागा देखील प्रवेशासाठी उपलब्ध राहणार आहेत.

# 'बोपदेव घाट' प्रकरणातील पीडित तरुणीला पाच लाखांची नुकसान भरपाई, 'मनोधैर्य योजने'अंतर्गत मिळणार मदत

पुणे । प्रतिनिधी

पुण्यात काही दिवसांपुर्वी बोपदेव घाट परिसरात फिरण्यासाठी गेलेल्या तरूणीवर सामूहिक बलात्कार झाल्याची घटना घडली होती. या प्रकरणातील नराधम आरोपींना पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत, तर पिडित तरूणीला न्याय मिळण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. दरम्यान या प्रकरणातील पीडित तरुणीला विधी सेवा प्राधिकरणाकडून 'मनोधैर्य' योजने अंतर्गत पाच लाख रुपयांची नुकसान भरपाई देण्यात येणार आहे. विधी सेवा प्राधिकरणाकडून याबाबतचा अर्ज मंजूर करण्यात आला आहे. विधी सेवा प्राधिकरणाच्या 'मनोधैर्य' योजनेच्या अंतर्गत अत्याचार प्रकरणातील पीडितांना मदत केली जाते.



पुणे शहर परिसरातील बोपदेव घाटात ३ ऑक्टोबर रोजी मित्रासोबत फिरायला गेलेल्या तरुणीला कोयत्याचा आणि शस्त्रांचा धाक दाखवून ३ नराधमांनी तिच्यावर सामूहिक अत्याचार केला होता. याप्रकरणी दोन आरोपींना पोलिसांनी वेगवेगळ्या ठिकाणावरून अटक केली आहे, त्यांच्या तिसऱ्या साथीदाराचा शोध घेण्यात येत आहे. या प्रकरणातील आरोपींनी सर्व माहिती सांगितली असून त्यांनी घटनास्थळ देखील दाखवलं आहे. या घटनेनंतर नागरिकांनी संताप व्यक्त केला होता. या घटनेतील पिडितेला आता नुकसान भरपाई देण्यात येणार आहे. 'मनोधैर्य' योजनेच्या अंतर्गत नुकसान भरपाई मिळवण्यासाठी पीडित तरुणीने विधी सेवा प्राधिकरणाकडे अर्ज केला होता. अर्ज दिल्यानंतर नऊ दिवसांमध्ये संबंधित अर्ज मंजूर करून पीडित तरुणीला नुकसान भरपाई देण्यात येत आहे.

नुकसान भरपाईसाठी मिळणाऱ्या रकमेपैकी २५ टक्के रक्कम ही तरुणीला रोख रकमेच्या स्वरूपात देण्यात येणार आहे. तर उर्वरित ७५ टक्के रक्कम ही दहा वर्षांसाठी पीडित तरुणींच्या नावे बँकेत मुदत ठेव म्हणून ठेवण्यात येईल. या रकमेतून मिळणाऱ्या व्याजातून ती उपचार घेऊ शकणार आहे, त्याचबरोबर इतर दैनंदिन खर्च भागवण्यासाठी मदत होईल.

काय आहे मनोधैर्य योजना?

एखाद्या घटनेतील पीडित बालक किंवा महिलेचं पुनर्वसन करण्यासाठी 'मनोधैर्य' योजना सुरू करण्यात आलेली आहे. विधी सेवा प्राधिकरणाच्या माध्यमातून या योजनेची अंमलबजावणी होते. संबधित पीडित महिलेला कमीत कमी ३० हजार रुपयांपासून जास्तीत जास्त दहा लाख रुपयांची नुकसान भरपाई दिली जाते. पीडित महिलांना आधार आणि धैर्य मिळण्यासाठी या योजनेची सुरूवात करण्यात आली होती.

# लम्पी प्रतिबंधात्मक लस फेब्रुवारीत

पुणे । प्रतिनिधी

लम्पी स्कीन (चर्म) रोगाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी पुण्यातील भारतीय पशुवैद्यकीय जैवपदार्थ निर्मिती संस्थेने (आयव्हीबीपी) 'लम्पी प्रतिबंधात्मक लस' तयार केली आहे. चाचणी यशस्वीपणे पूर्ण झाली असून केंद्राच्या परवानगीची प्रतीक्षा आहे. भारतीय औषध महानियंत्रक संस्थेकडून (डीसीजीआय) उत्पादनाचा अंतिम परवाना प्राप्त होऊन लशीचे उत्पादन करून फेब्रुवारी २०२५ पासून वितरण केले जाणार आहे.

पुण्यामध्ये दीड वर्षापूर्वी जनावरांना लम्पी रोगाची साथ फैलावली होती. त्या वेळी या रोगासाठी प्रतिबंधात्मक लस नव्हती, त्यामुळे शेळ्यांसाठी वापरण्यात येणारी देवी रोग प्रतिबंधासाठी उपलब्ध असलेली लस वापरून जनावरांचे लसीकरण करण्यात आले. अद्यापही हीच लस वापरली जाते. मात्र, आता लम्पीची प्रतिबंधात्मक लस फेब्रुवारीत उपलब्ध होण्याची अपेक्षा आयव्हीबीपी संस्थेला आहे. ही लस उपलब्ध झाल्यानंतर पशुपालकांचे नुकसान टाळता येणार आहे.

पुणे जिल्ह्यात लम्पीच्या साथीमध्ये १२०० हून अधिक जनावरांचा मृत्यू झाला होता, तर १३ हजार जनावरांना बाधा झाली होती. त्यामुळे 'आयव्हीबीपी' संस्थेने निर्मिती केलेली लस जनावरांसाठी फायदेशीर ठरणार आहे. हरियानातील राष्ट्रीय अश्व अनुसंधान केंद्राने लम्पी लशीचे तंत्रज्ञान विकसित केले असून, दिल्ली येथील भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या कंपनीने व्यावसायिक तत्त्वावर २०२२ मध्ये आयव्हीबीपी संस्थेला लम्पी लशीचे तंत्रज्ञान हस्तांतर करून घेतले. त्यानंतर 'आयव्हीबीपी'मधील चार अधिकाऱ्यांनी प्रशिक्षण घेऊन चाचणीची तयारी केली. परवानगीनंतर पुण्यात वासरांवर चाचणी घेण्यात आली.